CMYK

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. २६ एप्रिल २०२६ | वर्ष – ४ थे | अंक १३ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अमेरिका - इराण युद्धाचे जागतिक परिणाम ; ३ कोटी लोक गरिबीच्या उंबरठ्यावर !

**वृत्तसंस्था**

**नवी दिल्ली :** संयुक्त राष्ट्राच्या डेव्हलपमेंट अँड इकॉनॉमिक विभागाच्या मते, जर अमेरिका आणि इराणमधील तणाव असाच राहिला आणि होर्मुझची सामुद्रधुनी दीर्घकाळ बंद राहिली, तर जागतिक विकास दर (GDP) १.५ ते २ टक्क्यांनी घसरेल. ही घसरण जगातील ३ कोटी लोकांना अत्यंत गरिबीत ढकलण्यास पुरेशी आहे. यामागे केवळ युद्धच नाही तर इतरही मोठी कारणे आ–हेत. संयुक्त राष्ट्र विकास प्रमुख अलेक्झांडर डी क्रू यांनीमध्य–पूर्वेतसुरू असलेल्या संघर्षामुळे जागतिक स्तरावर होणाऱ्या धोकादायक परिणामांवर लक्ष केंद्रित करत मोठा इशारा दिला आहे. हे ३ कोटी लोक प्रामुख्याने आफ्रिकी, दक्षिण आशियाई अशा देशांमधील आहेत जे अन्नासाठी आणि इंधनासाठी आयातीवर अवलंबून आहेत. जेव्हा इंधनाचे दर वाढतात, तेव्हा प्रत्येक गोष्टीची किंमत वाढते. इराण आणि आजूबाजूचा परिसर हा खतांसाठी लागणाऱ्या कच्च्या मालाचा मोठा स्त्रोत आहे. खते महागली की उत्पादन कमी होते आणि अन्नाचे दर वाढतात.अमेरिका आणि इराणमधील गेल्या ५० दिवसांपासून सुरू असलेल्या संघर्षाचा सर्वाधिक परिणामहोर्मुझच्या सामुद्रधुनीवरझाला आहे. जगभरात कच्च्या तेलाच्या आयातीसाठी वापरला जाणारा हा महत्वाचा सागरी मार्ग गेल्या अनेक दिवसांपासून बंद आहे.



ज्यामुळे तेलाचे दर प्रति बॅरल १२० ते १५० डॉलर्सच्या पार जातील असा अंदाज वर्तवला जात आहे. यामुळे जागतिक अर्थव्यवस्था मंदा–वेल, बेरोजगारी वाढेल आणि पर्यायाने गरिबीही वाढेल.या गरिबीचा फटका भार–तालाही बसू शकतो. गेल्या काही वर्षात भारताने गरिबी निर्मूलनात मोठी प्रगती केली असली, तरी हा जागतिक परिणाम भारताला दोन प्रकारे भोगावा लागू शकतो. भारत त्याच्या गरजेपेक्षा ८० टक्के जास्त तेल आयात करतो. पण सध्याच्या युद्ध परिस्थितीच्या पार्श्र्वभूमीवर तेल महागले की देशांतर्गत महागाई वाढेल. ज्यामुळे दे–शातील सर्व सामान्य नागरिकांच्या खिशाला कात्री बसेल. जर जगभरात गरिबी वाढली, तर भारताकडून होणारी वस्तूंची आणि आयची सेवांची (IT SERVICES) निर्यात कमी होईल. ज्याचा परिणाम देशाच्या विकास दरावर होईल.संयुक्त राष्ट्राने हा इशारा केवळ भीती निर्माण करण्यासाठी नाही, तर जगातील शक्तिशाली देशांनी एकत्र येऊन हे युद्ध थांबवावे यासाठी दिला आहे. शनिवार, दि. २५ एप्रिल पासून पाकिस्तानच्या इस्लामाबादमध्येअमेरिका आणि इराणमध्ये शांतता चर्चासुरू झाली आहे. या चर्चेतून जो काही निर्णय होईल तोच जगातील या ३ कोटी लोकांचे भविष्य ठरवेल.

## गुरबक्ष सिंग यांचे निधन

**नवी दिल्ली :** भारतीय हॉकी विश्र्वातून एक दुःखद बातमी समोर आली आहे. १९६८ च्या ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या संघाचा भाग अस–लेले दिग्गज खेळाडू गुरबख्श सिंह ग्रेवाल यांचे निधन झाले आहे. ते ८४ वर्षांचे होते. पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, ग्रेवाल यांनी शुक्रवारी हृदयविकाराच्या झटक्याने अखेरचा श्र्वास घेतला. त्यांच्या निधनाने भारतीय क्रीडा विश्र्वात, विशेषत: हॉकी समुदायात शोकसागराची लाट पसरली आहे.

## जुन्या वादातून हत्या

**नागपूर :** नागपूर शहरातील कलमना पोलीस ठाणे हद्दीत जुन्या वादातून एका तरु–णाची निर्घृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणामुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून पोलिसांनी मुख्य आरोपीला अटक केली आहे, तर त्याचे तीन साथीदार अद्याप फरार आहेत. मृत तरुणाची ओळख रोशन धर्मसिंग उईके अशी आहे.

## आदिती ढिकले यांचे निधन

**नाशिक :** नाशिक (पूर्व) विधानसभा मतदार संघाचे आमदार ड राहुल ढिकले यांच्या पत्नी आदिती ढिकले यांचे हृदयविकाराने आज निधन झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार ड ढिकले यांच्या निवासस्थानी भेट देवून ढिकले कुटुंबियांचे सांत्वन केले. यावेळी त्यांचे समवेत जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, आमदार प्रा. देवयानी फरांदे, आमदार सीमा हिरे, आमदार सरोज अहिरे, पोलीस उपायुक्त मोनिका राऊत, पोलीस उपायुक्त किरणकुमार चव्हाण, तहसलीदार पंकज पवार, अपर तहसीलदार अमोल निकम आदी उपस्थित होते.

## तरुणाची आत्महत्या

**हिंगोली :** हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यात मित्राकडून होत असलेल्या त्रासाला कंटाळून २४ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. या कर्मचाऱ्याने आपल्याच मित्रासोबत अनैसर्गिक संबंधांसाठी तगादा लावला होता.या प्रकरणी नांदेड पोलीस दलातील कर्मचाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

# इतिहास आणि लोक कथांमध्ये फरक

## बागेश्वर बाबांच्या विधानावर फडणवीसांची भूमिका

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :** नागपूरमधील एका कार्यक्रमात बागेश्र्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास स्वामी यांच्या संदर्भात केलेल्या विधानावरून राज्यात नव्या वादाला तोंड फुटले आहे. या पार्श्र्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना, इतिहास आणि लोककथा यांतील फरक ओळखणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. अधिकृत ऐतिहासिक संदर्भ आणि ग्रंथांमध्ये अशा कोणत्याही प्रसंगाचा उल्लेख नसल्याचे स्पष्ट करत फडणवीस यांनी या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे.



धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी छत्रपती शिव–ाजी महाराजांशी संबंधित एका प्रसंगाचा उल्लेख केला होता, ज्यावरून राजकीय आणि सामाजिक स्तरातून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. त्यावर भाष्य करताना मुख्यमंत्री म्हणाले की, आपण ज्या ऐतिहासिक पुराव्यांचा अभ्यास केला आहे, त्यात शास्त्री यांनी सांगितलेल्या घटनेचा कोणताही आधार सापडत नाही. त्यामुळे ऐतिहासिक तथ्यांची मांडणी करताना अधिकृत संदर्भांचे भान ठेवणे गरजेचे आहे, असे त्यांनी सूचित केले.

दुसरीकडे, उद्धव ठाकरे आणि फडणवीस यांच्यात 'वर्षा' निवासस्थानी मध्यरात्री गुप्त भेट झाल्याचे वृत्त मुख्यमंत्र्यांनी फेटाळले. ते म्हणाले, उद्धव ठाकरे यांना भेटायचे असेल तर मी ते उघडपणे करेन, आम्हाला लपून–छपून भेटण्याची कोणतीही गरज नाही. आमच्यात असे कोणतेही विषय नाहीत जे लपवून ठेवावे लागतील.

# 'शिवछत्रपतींचा अवमान करणाऱ्या भोंदू बागेश्वरवर महाराष्ट्रात बंदी घाला : आ. पवार

**तभा वृत्तसेवा**

नागपूर:आपल्या वेगवेगळ्या दाव्यांमुळे नेहमीच चर्चेत राहणारे बागेश्र्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री उर्फ बागेश्र्वर बाबा पुन्हा एकदा मोठ्या वादात सापडले आहेत. नागपूर येथील भारदुर्गा शक्तिस्थळ शिलान्यास कार्यक्रमात बोलताना त्यांनी छत्रपती शिवाजी महार–ाज यांच्याबद्दल अत्यंत वादग्रस्त विधान केले.

युद्ध करताना महाराज थकले होते, त्यांनी आप–ला मुकूट समर्थ रामदास स्वामींच्या चरणी अर्पण करून विश्रांतीची इच्छा व्यक्त केली होती, असा दावा धीरेंद्र शास्त्री यांनी केला. विशेष म्हणजे, ज्या व्यासपीठावर सरसंघचालक मोहन भागवत, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी उपस्थित होते, त्याच ठिकाणी हे वक्तव्य केल्याने आता संतापाची लाट उसळली आहे. धीरेंद्र शास्त्री यांनी शिवराय आणि समर्थ रामदास स्वामी यांच्या भेटीचा एक प्रसंग सांगताना दावा केला की, शिवरायांनी थकल्यामुळे राजपाट सोडण्याची तयारी दर्शवली होती. त्यावर रामदास स्वामींनी तो मुकूट पुन्हा महाराजांच्या डोक्यावर ठेवून, 'हे राज्य माझे आहे आणि तुला फक्त त्याचे संचालन करायचे आहे', असे सांगितले. इतिहासाचा कोणताही आधार नसलेले हे विधान समोर आल्यानंतर शिवप्रेमींमधून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

यापूर्वीही तुकोबाराय आणि ज्ञानेश्र्वर माऊलींबद्दल वादग्रस्त वक्तव्ये करणाऱ्या बागेश्र्वर बाबांनी आता थेट शिवछत्रपतींचा अवमान केल्याचा आरोप केला जात आहे.

या प्रकरणावर आता राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आक्रमक पवित्रा घेत सरकारवर जोरदार टीकास्त्र सोडले आहे. शिवराय थकले होते, असे म्हणणारा हा भोंदू महाराष्ट्रात पुन्हा दिसता कामा नये, अशा शब्दांत त्यांनी त्यांचा संताप व्यक्त केला. छत्रपतींचा अवमान होत असताना राज्यातील बडे नेते त्याच व्यासपीठावर असतानाही शांत कसे बसले? असा सवाल करत, बागेश्र्वर बाबावर महाराष्ट्रात तातडीने बंदी घालण्याची मागणी पवार यांनी केली आहे.

# इराणसोबतच्या चर्चेसाठी ट्रम्प यांचे दूत पाकिस्तानात दाखल

**वृत्तसंस्था**

**इस्लामाबाद :** इराणला उद्ध्वस्त करण्याची भाषा करणारे डोनाल्ड ट्रम्प यांनी पुढील शांतता चर्चेसाठी पुन्हा एकदा पुढाकार घेतला आहे. अमेरिकेचे विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ आणि अनुभवी सल्लागार जेरेड कुशनर हे इराण–चे परराष्ट्र मंत्री अब्बास अरा–घची यांच्याशी चर्चा करण्यासाठी पाकिस्तानात दाखल झाले आहेत. एकीकडे व्हाईट हाऊसने या चर्चेतून सकारात्मक प्रगतीची आशा व्यक्त केली असली, तरी दुसरीकडे अमेरिकेने इराणची जप्त केलेली मालमत्ता मुक्त न केल्यास त्यांनी होर्मुझ मार्ग बंद ठेवण्याचा इशारा दिला आहे. आता ही ऐतिहासिक भेट कितपत यशस्वी ठरते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.





दरम्यान, व्हाईट हाऊसच्या प्रेस सेक्रेटरी कॅरोलिन लेविट यांनी एका वृत्तात सांगितले की, 'अलीकडच्या दिवसांत इराणच्या बाजूने काही प्रगती दिसून आली आहे'. यावरून पाकिस्तानच्या इस्लामाबादमधील आगामी चर्चा यशस्वी होण्याची चिन्ह दिसत आहेत. तसेच त्यांनी असेही म्हटले आहे की, 'अमेरिकेला आशा आहे की, आठवड्याच्या अखे–रीस अपेक्षित असलेल्या चर्चेत आणखी सकारात्मक प्रगती दिसून येईल' ही शांतता चर्चा यशस्वी झाली तर केवळअमेरिका आणि इराणलाचनाही तर, जागतिक स्तरावरील सर्वच देशांना दिलासा मिळणार आहे.एकीकडे अमेरिका शांतता चर्चेसाठी सतत पुढाकार घेत आहे, तर दुसरीकडे इराणचे परराष्ट्र मंत्री अराघची यांनी हे युद्ध पुन्हा अति तीव्र स्वरूप घेऊ शकते असा इशारा दिला आहे. त्यांनी त्यांच्या अधिकृत एक्स अकाउंटवरील एका व्हिडिओमध्ये असे म्हटले आहे की, जर पुढील ४८ तासात कोणताही ठोस प्रस्ताव मांडला गेला नाही, तर सध्याची शस्त्रसंधी भंग होऊ शकते, ज्यामुळेपश्र्चिम आशियातील तणाववाढण्याचे संकेत मिळत आहेत.' तसेच ते पुढे म्हणाले, 'जोपर्यंत इराणची सुमारे १.१ ट्रिलियन डॉलर्स किमतीची गोठवलेली मालमत्ता सोडली जात नाही, तोपर्यंत होर्मुझची सामुद्रधुनी बंद राहील.'

# शिक्षकांसाठी ई–केवायसी अनिवार्य; मे महिन्याच्या वेतनावर परिणाम होण्याची शक्यता

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :** राज्य शासनाच्या वित्त विभागाने दिलेल्या आदे–शानुसार शालार्थ प्रणालीद्वारे वेतन घेणाऱ्या सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांसाठी बँक खात्याची ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. ही प्रक्रिया वेळेत पूर्ण न झाल्यास मे महिन्याचे वेतन रोखले जाण्याची शक्यता असल्याने शिक्षक संघटनांनी तातडीने कार्यवाहीचे आवाहन केले आहे.

राज्य शासनाने २७ मार्च २०२६ रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार शासकीय, निमशासकीय तसेच अनुदानित संस्थांमधील सर्व कर्मचाऱ्यांनी ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक आहे. मात्र, अंमलबजावणीदरम्यान अनेक शिक्षकांना तांत्रिक अडचणी येत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत.या पार्श्र्वभूमीवर महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती ने सविस्तर मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. शिक्षकांनी आपले आधार कार्ड कोणत्या बँक खात्याशी लिंक आहे याची पडताळणी एनपीसीआय किंवा आधारच्या अधिकृत संकेतस्थळावरून करावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# 'आप' म्हणजे आलिशान आदमी पार्टी; भाजपचे केजरीवालांवर टीकास्त्र

**वृत्तसंस्था**

**नवी दिल्ली :** भारतीय जनता पक्षाने दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांच्या नव्या बंगल्यावरून त्यांच्यावर जोरदार हल्ला चढवला आहे. भाजपने म्हटले आहे की, केजरीवाल यांची आलिशान जीवनशैली पाहता त्यांच्या पक्षाचे नाव बदलून 'आलीशान आदमी पार्टी' ठेवावे.

प्रवेश वर्मा म्हणाले की, केजरीवाल यांनी दिल्लीतील कोविडच्या लाटेच्या ऐन काळात 'शीश महाल' बांधला. त्यावेळी दिल्लीकर औषधांची मागणी करत होते, पण 'शीश महाला'चे काम थांबले नाही. त्यांनी असा आरोप केला की, दिल्लीच्या मतदारांनी 'रहमान डकेट'चा पराभव केल्यानंतर तो पंजाबला पळून गेला.

केजरीवाल यांनी भगवंत मान यांच्या घर–ाशेजारील चार सरकारी घरांपैकी एकात वास्तव्य केले. इतर घरांमध्ये सत्येंद्र जैन, संजय सिंह आणि मनीष सिसोदिया राहत होते. वर्मा म्हणा–ले की, केजरीवाल यांनी पंजाबमध्ये आणखी एक 'काचेचा महाल' बांधल्यामुळे भगवंत मान नाराज आहेत.

केजरीवाल २४ एप्रिल २०२६ रोजी ९५ लोधी इस्टेट येथील बंगल्यात राहायला गेले. वर्मा म्हणाले की, स्वतःला साधे म्हणवण–ारे केजरीवाल आता अत्यंत आलिशान जीवन जगत आहेत.

## खरातने जवळच्या मित्राला देखील सोडले नाही

नाशिक : अशोक खरातचे प्रकरण हे अधिक गुंतागुंतीचे होत चालले असून खरातच्या अडचणी वाढत चालल्या आ–हेत. आतापर्यंत त्याच्यावर तब्बल १९ गुन्हे दाखल झाले असून शेवटचा गुन्हा खरातच्या जवळच्या मित्रानेच केला आहे अशी माहिती आता समोर आली आहे.अशोक खरात प्रकरण मार्च महिन्यात बाहेर आले त्याच्यापाठोपाठ गुन्ह्यांची यादीच निघाली. खरातने अनेकांना मृत्यूची भीती दाखवून, कुटुंब उध्वस्थ करण्याची धमकी देऊन किंवा पैशाच- भरभराटीच आमिष दाखवून महत्व–ाचा मुद्दा म्हणजे महिलांचे लैंगिक शोषण यामुळे त्याने अनेकांना लाखोंचं गंडा घातला. या सगळ्यात आपल्या मित्राला देखील त्याने सोडले नाही.

# लोकल ट्रेनचा विलंब आता विसरा!

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :** मुंबईकरांसाठी लोकल ट्रेन विलंबाने धावणे ही काही नवीन गोष्ट नाही. गेल्या काही दिवसांत तर अशा घटना वाढल्या आहेत. कधी ओव्हरहेड वायर तुटल्यामुळे तर कधी लोकलचं रुळावरून घसरल्यामुळे लोकल ट्रेनचा खोळंबा होतो. पण याशिवाय दररोज ट्रेन उशीराने येण्याचं कारण काय? मुंबईकरांचा दैनंदिन प्रवास खोळंबण्याने मागचं महत्त्वाचं कारण म्हणजे एक्सप्रेस आणि मेल गाड्या. अनेक वेळा या ट्रेन उशीराने धावत असल्यामुळे उपनगरीय रेल्वे सेवा विस्कळीत होते आणि लोकल प्रवाशांचे हाल होतात. १८ वर्षांपूर्वी या समस्येवर तोडगा काढण्याचं नियोजन करण्यात आलं होतं. यासाठी उपनगरीय रेल्वे गाड्या आणि मेल/एक्सप्रेसचे विभाजन करूनदोन्ही रेल्वेसाठी स्वतंत्र रेल्वे मार्गबांधण्याची योजना तयार केली होती. २००८मधील या योजनेला अखेर चालना मिळत असून दोन्ही पश्र्चिम आणि मध्य रेल्वेवर दोन नव्या रेल्वे मार्गिका तयार करण्याच्या कामांना वेग मिळाला. यामुळे मध्य आणि पश्र्चिम रेल्वेवर पाचव्या आणि सहाव्या मार्गिकांच्या कामांना अखेर सुरूवात झाली आहे.दोन्ही मार्गांवरील कामं सुरू असल्यामुळे पश्र्चिम आणि पूर्व उपनगरातील लोकल प्रवास सुखकर होणार आहे.मध्य रेल्वे मार्गावरीलपरेल ते पश्र्चिम रेल्वे मार्गावरील मुंबई सेंट्रलपर्यंत या मार्गिकांचा विस्तार होणार आहे.

# पुणे शहराबाहेर मेट्रोचा विस्तार! उपनगरामध्ये ४ नव्या मार्गांचा प्रस्ताव; खेड-शिवापूर टोल नाक्यापर्यंत जोडणार

**तभा वृत्तसेवा**

**पुणे :** शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीच्या पार्श्र्वभूमीवर मेट्रोचे जाळे उपनगर आणि बाह्य भागांपर्यंत वाढवण्याचा महत्त्वाचा निर्णय महापालिका सर्वसाधारण सभेत घेण्यात आला. नगरसेवकांनी मांडलेल्या उपसूचनांद्वारे चार नवीन मेट्रो विस्तार प्रस्तावांना एकमताने मंजुरी देऊन हा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवण्यात आला आहे.

सध्या पुणे मेट्रो प्रकल्पांतर्गत केवळ दोन मार्ग कार्यरत असून, उर्वरित मार्ग विविध टप्प्यांवर प्रलंबित आहेत. या पार्श्र्वभूमीवर भविष्यातील वाहतुकीचा ताण लक्षात घेऊन मेट्रो नेटवर्क शहराच्या हद्दीबाहेर नेण्याची मागणी जोर धरू लागली आहे. सभागृहाने मंजूर केलेल्या प्रस्तावांनुसार कात्रज ते खेड शिवापूर टोलनाका, खडकवासला ते डोणजे, वाघोली ते लोणीकंद आणि कात्रज ते उंड्री असे चार नवीन मार्ग प्रस्तावित करण्यात आले आहेत. या विस्तारांमुळे मेट्रो सेवा शहराबाहेर २० किलोमीटरपर्यंत वाढवण्याचा प्रयत्न होणार आहे.

नगरसेविका वर्षा तापकीर यांनी स्वारगेट–कात्रज मार्ग पुढे खेड शिवापूरपर्यंत नेण्याचा प्रस्ताव मांडला होता. या प्रस्ताव–ाला स्थायी समितीत मंजुरी मिळाल्यानंतर त्यावर सर्वसाधारण सभेत चर्चा झडली; तसेच काकासाहेब चव्हाण आणि अनिता इंगळे यांनी खडकवासला–डोणजे विस्त–ाराची उपसूचना देऊन सिंहगड आणि पानशेत परिसरातील वाढत्या पर्यटनाचा मुद्दा उपस्थित केला. या वेळी कात्रज–





उंड्री आणि वाघोली–लोणीकंद मार्गांवरही मेट्रोसाठी उपसूचना दिली. सभागृहाने सर्वच उपसूचनांना मंजुरी दिली असून, प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी सरकारकडे पाठविण्यात येणार आहे.

कात्रज ते खेड–शिवापूरपर्यंत विस्तार केल्यावर या मेट्रो मार्गाला पुण्यातील प्रस्तावित रिंग रोडशीही जोडले जाणार आहे. हा पीएमआरडीए रिंग रोड शहराबाहेर तयार होणाऱ्या बाह्य रिंग रोडला सुद्धा जोडला गेला आहे. त्यामुळे बाह्य व अंतर्गत रिंग रोडसह पुणे मेट्रो अशी तिहेरी कनेकटीव्हीटी निर्माण होणार आहे. दक्षिण पुण्यातील वाढत्या शहरीकरणामुळे या विस्ताराचा प्रस्ताव पाठवण्यात आला आहे.

वाढत्या लोकसंख्येमुळे वाहतूक कोंडीही वाढत आहे. नव्या चार मेट्रो मार्गिकांना सुरूवात होताच नागरिकांना प्रवासाचा एक जलद, सुरक्षित आणि पर्यावरणपूर्वक पर्याय मिळणार आहे. यामुळे सार्वजनिक वा–हतूक सुखद होईल. मेट्रो कॉरिडोर आणि रिंग रोडच्या प्रस्तावित कनेकटीव्हीटीमुळे शहरातील वाहतूक संतुलित होण्यास मदत होईल. यामुळे कात्रज, शिवापूर आणि रिंग रोड लगतच्या नव्याने विकसित होणाऱ्या परिसरांमधील रहिवाशांना मोठा फायदा होणार आहे. शहराच्या सर्वांगीण विकासात हा प्रकल्प महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## ▪ उत्पादन वाढल्याने चारा प्रश्न मिटला ▪

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २५ एप्रिल :** उन्हाळ्याच्या शेवटी आणि पावसाळ्याच्या तोंडावर चाराटंचाई ही असतेच. त्यामुळे योग्य नियोजन, गाळपेऱ्यात चारा बियाणांचा समावेश यासारख्या बाबी कराव्या लागतात. यंदा मात्र, चाराटंचाईच निर्माण होणार आहे. जिल्ह्यात १५० दिवस पुरेल एवढा चारा शिल्लक आहे. त्यामुळे वेगळे असे काही करावे लागणार नाही.

उन्हाळ्यात वाळलेल्या चाऱ्याबरोबर हिरवा चारा म्हणून मका, कडवळ आणि गवतही जनावरांच्या दावणीला असते. दरवर्षी अधिकचे पैसे खर्ची करुन चारा विकत घेण्याची नामुष्की शेतकऱ्यांवर ओढावते. गतवर्षी सरासरीपेक्षा अधिक झालेला पाऊस शिवाय सोयाबीन, तुरीचे वाढलेले उत्पादन आणि यामधून मिळणारा चारा यामुळे यंदा चाराप्रश्र्न अधिक तीव्र झालाच नाही. २१ व्या पशुगणनेत पशुधनाची संख्याही घटली आहे. जिल्ह्यात लहान-मोठे गायी,म्हशी आणि शेळ्या व मेंढ्यांची संख्या ही ५ लाख १५ हजार २८३ एवढी आहे. त्यानुसार ८ लाख ७४ हजार १६१ मे.टन चारा शिल्लक आहे. यामध्ये कडबा, सोयाबीन गुळी, तुरीचे बुस्कट, मका, वनक्षेत्र, पडीत क्षेत्रात चारा आहे. जनावरांच्या संख्येनुसार महिन्याकाठी ५९ हजार ८८३ मे. टन चाऱ्याची आवश्यकता असते. शिल्लक चाऱ्यानुसार आगामी ५ महिने तरी चाऱ्याची टंचाई भासणार नसल्याचे सांगण्यात येत आहे.



## विविध वृत्त...

### मुरुडच्या पोट निवडणुकीसाठी सरळ लढत

**तभा वृत्तसेवा**

**जळकोट दि. २५ एप्रिल :** लातूर तालुक्यातील मुरुड (बु.) ग्रामपंचायतीच्या वार्ड क्रमांक ४ साठी होत असलेल्या पोटनिवडणुकीत दोन उमेदवारांमध्ये थेट सामना रंगणार असून गावातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. दिवंगत सदस्य सूर्यकांत (राजेंद्र) जगन्नाथ गाडे यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी ही पोट निवडणूक होत आहे.

या निवडणुकीसाठी मंगळवार, दि. २८ एप्रिल रोजी मतदान होणार असून सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत समाज जागृती विद्यालयात ३ बूथवर मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या निवडणुकीत दिवंगत सदस्यांच्या पत्नी श्रीमती तिलोत्तमा सूर्यकांत गाडे निवडणूक रिंगणात आहेत. दुसरीकडे, समाधान महादेव शितोळे मैदानात उतरले आहेत.

दोन्ही उमेदवारांकडून घरोघरी जाऊन मतदारांशी संपर्क साधला जात असून प्रचाराला वेग आला आहे. स्थानिक पातळीवर विविध बैठका व संवादाच्या माध्यमातून मतदारांना आपल्या बाजूने वळविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

या वार्डात एकूण ३,४९४ मतदार असून त्यामध्ये १,६८६ महिला व १,८०८ पुरुष मतदारांचा समावेश आहे. पोटनिवडणुकीचा निकाल कोणाच्या बाजूने लागणार, याकडे संपूर्ण मुरुडकरांचे लक्ष लागून राहिले आहे.

### जगन्नाथ शिंदेंची चन्नबसवेश्वर कॉलेजला सदिच्छा भेट

**तभा वृत्तसेवा**

**जळकोट दि. २५ एप्रिल :** फार्मसी क्षेत्रातील मान्यवर व्यक्तिमत्त्व जगन्नाथ शिंदे यांनी येथील चन्नबसवेश्र्वर फार्मसी कॉलेज येथे सदिच्छा भेट दिली. दरम्यान, महाविद्यालयाचा परिसर, प्रयोगशाळा, वर्गखोल्या आणि विविध शैक्षणिक उपक्रमांचा त्यांनी आढावा घेतला. प्राचार्य डॉ. संजय थोंटे यांनी महाविद्यालयात राबविण्यात येणारे उपक्रमाची माहिती दिली. यावेळी जगन्नाथ शिंदे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून फार्मासिस्ट म्हणून सामाजिक जबाबदारी, नैतिकता आणि व्यावसायिक प्रामाणिकतेचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या शेवटी महाविद्यालयातर्फे जगन्नाथ शिंदे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### युवा भीम सेनेच्या मराठवाडा अध्यक्षपदी सुनील दांडगे

**तभा वृत्तसेवा**

**जळकोट दि. २५ एप्रिल :** युवा भीम सेनेची वार्षिक आढावा बैठक नुकतीच लातूर येथे उत्साहात पार पडली. या बैठकीत संघटनेच्या बांधणीवर चर्चा करण्यात येऊन, आगामी काळासाठी नव्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. यामध्ये युवा भीम सेनेच्या मराठवाडा अध्यक्षपदी सुनील दांडगे यांची, तर लातूर तालुका अध्यक्षपदी स्वप्नील कदम यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष पंकज काटे, सचिव राहुल लांडगे आणि प्रदेश सल्लागार मार्शल माने यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते नवनियुक्तपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रदेश प्रवक्ते सुफी सय्यद शमशोद्दीन, पंचायत समिती सदस्य पंकज गायकवाड, महेबूब भाई सय्यद, आश्रुबा कांबळे, अमोल जाकते, तनिष्क काटे, शेखर कांबळे, महेंद्र मोरे, अजय कांबळे यांच्यासह सविता निकम, सुमेध गोरसे, रोहन रायभोळे, बाळू गाडे, अभी मांदळे, पंकज चव्हाण, रत्नदीप रायभोळे, गणेश पोटभरे, शिरीष मांदळे, रोहित धावारे, गौतम कसबे, आजम मुजावर, गौरव कांबळे, अनिकेत वाघमारे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### सराफा व्यापाऱ्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २५ एप्रिल :** अहिल्यानगर येथील कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये सराफ सुवर्णकार बांधवांवर तसेच सराफ सुवर्णकार संरक्षण समितीच्या पदाधिकाऱ्यांवर झालेल्या अमानवीय व बेकायदेशीर अटक, धमक्या देणे, मारहाण प्रकरणी संपूर्ण महाराष्ट्रातून प्रत्येक तहसीलदार तसेच प्रांत अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्याचे प्रक्रिया होत आहे. लातूरच्या सराफ व्यापाऱ्यांनीही जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले.

### विश्वनाथ खंदाडे सन्मानित




**तभा वृत्तसेवा**


**लातूर दि. २५ एप्रिल :** महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद लातूरच्या वतीने लातूर येथे शिक्षण परिषद व जिल्हास्तरीय शिक्षक सन्मान पुरस्कार कार्यक्रम झाला, त्यात ज्ञानेश्र्वर विद्यालयातील माध्यमिक शिक्षक विश्र्वनाथ शिवदासराव खंदाडे यांना जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले.

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग लातूर यांच्या वतीने शिक्षण परिषद सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, शिक्षक आमदार विक्रम काळे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, राज्याध्यक्ष मधुकर उन्हाळे, जि. प. गटनेते रामभाऊ तिरुके, जिल्हाध्यक्ष मच्छिंद्र गुरमे, लातूर एज्युकेशन सोसायटी लातूर संस्थेचे उच्च अधिकार समिती प्रमुख प्रा. प्रकाश शिंगडे, डायट प्राचार्य श्रीमती गिरी, रेणापूरच्या नगराध्यक्षा शोभाताई आकणगिरे, जि. प. सभापती शिवकन्या गोडभरले,अंजली विश्र्वनाथ खंदाडे आदी उपस्थित होते.

या पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष विक्रम गोजमगुंडे, उपाध्यक्ष प्रल्हादराव दुडीले, सचिव डी. एन. शेळके, ज्ञानेश्र्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय मलवाड, उपमुख्याध्यापक माधव क्षीरसागर, पर्यवेक्षक बैनगीरे, श्रीमती पाटील, संजय कासले व सर्व शिक्षक बंधू-भगिनी यांनी अभिनंदन केले आहे.

## वसुधैव कुटुंबकम संदेशच जगाला विनाशापासून वाचवेल : प्रा.डॉ. विश्वनाथ कराड





**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २५ एप्रिल :** वसुधैव कुटुंबकम्' आणि 'एकम् सत विप्र बहुदा वदन्ति' हा भारतीय संस्कृतीचा संदेश संपूर्ण जगाला विनाशाच्या छायेतून वाचवू शकतो. हाच संदेश देणार्या अद्वितीय विश्र्वधर्मी मानवता तीर्थ भवनातून जगभर शांतता प्रस्थापित करण्यासाठी संत श्री गोपाळ बुवा महाराजांचा अखंड हरिनाम सप्ताह आणि शिवशक्ती अनुष्ठान महायज्ञ आयोजित करण्यात आला आहे. असा संदेश विश्र्वधर्मी प्रा.डॉ. विश्र्वनाथ दा. कराड यांनी दिला.

विश्र्वशांती केंद्र आळंदी, माईर्स एमआयटी, पुणे व समस्त गावकरी मंडळ रामेश्र्वर यांच्या संयुक्त विद्यमाने विश्र्वधर्मी मानवतातीर्थ भवन येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. तसेच विश्र्वधर्मी प्रा.डॉ. विश्र्वनाथ दा. कराड यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या विश्र्वधर्मी मानवतातीर्थ भवनाची वास्तुशांती होम हवन आणि आध्यात्मिक ऊनुष्ठानाच्या माध्यमातून करण्यात आली.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्र्वधर्मी प्रा.डॉ. विश्र्वनाथ दा. कराड यांच्या शुभार्शीवादाने व एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष राहुल विश्र्वनाथ कराड यांच्या मार्गदर्शनात या सप्ताहाचे व यज्ञाचे आयोजन करण्यात येत आहे.

यावेळी तुळशीराम दा. कराड, कमल राजेखां पटेल, दशरथ महाराज कराड, शरद रामकृष्ण पाटील, रामेश्र्वरचे सरपंच सचिन मोतीराम कराड आणि राजेश का. कराड उपस्थिती होते.

शिवशक्ती अनुष्ठान महायज्ञ राजेश का. कराड यांनी सपत्नीक केला. यावेळी कलश यात्रा आणि शोभायात्रा काढण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात गोपाळबुवा मंदिरातून झाली. येथे देवीच्या मूर्तींची पूजा करण्यात आली. आणि विविध देवतांचे विधीपूर्वक आवाहन करण्यात आले. यानंतर कलश पूजन झाले. येथे रविवार पर्यंत धार्मिक कार्यक्रम आणि विधी आयोजित केले आहेत.

विश्र्वधर्मी प्रा.डॉ.विश्र्वनाथ दा. कराड यांनी आपल्या संदेशात सांगितले की,आज संपूर्ण जग भीती आणि अनिश्र्चिततेच्या छायेखाली जगत आहे. एकीकडे जागतिक युद्धाचे गंभीर संकट घोंगावत आहे तर दुसरीकडे भीषण हिंसाचार, रक्तपात, दहशतवाद, समाजाच्या प्रत्येक स्तरावरील हत्या आणि राष्ट्रीय सीमांवरुन सुरू असलेल्या वादांनी संपूर्ण जगाला संशय आणि अविश्र्वासाच्या अंधारात लोटले आहे. या अस्थिरतेवर एकमेव उपाय म्हणजे परस्पर सामंजस्य आणि वैश्र्विक बंधुत्वाची भावना वाढवण्यासाठी केलेला प्रामाणिक प्रयत्न आहे.

महाराष्ट्रातील मराठवाडा भागातील रामेश्र्वर रुई हे गाव यज्ञभूमी म्हणून ओळखले जाते. येथे हिंदू आणि मुस्लिम बांधवांनी मिळून विश्र्वधर्मी श्री राम रहीम मानवता सेतू, भगवान श्रीराम मंदिर, तथागत गौतम बुद्ध विहार, नूतनीकरण केलेली जामा मशीद आणि हजरत जैनुद्दीन चिश्ती दर्गा सारख्या अनेक उल्लेखनीय वास्तू उभारल्या आहेत. अशा ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक प्रयत्नांमुळे रामेश्र्वर रुई हे मानवता तीर्थ म्हणून उदयास आले आहे.

डॉ. राहुल विश्र्वनाथ कराड यांनी संदेशात सांगितले की,रामेश्र्वरचे रुई नाव संपूर्ण जगभरात मानवतेचा व विश्र्वशांतीचा संदेश देणारे गाव म्हणून ओळखले जात आहे. २१ व्या शतकात भारतीय संस्कृती ही संपूर्ण जगाला सुख, समाधान व शांतीचा मार्ग दाखखेल. तसेच ज्ञानाचे दालन म्हणून उद्यास येईल.

या वेळी रामेश्र्वरच्या पंचक्रोशितील भाविक भक्त आणि माता भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

## श्री गणेश सेवाभावी संस्थेच्या वतीने होतकरू विद्यार्थिनीस आर्थिक मदत



**तभा वृत्तसेवा**


**लातूर दि. २५ एप्रिल :** वडिलांचे दुर्दैवी निधन झालेले असतानाही आपला बारावी परीक्षेचा गणित विषयाचा पेपर देऊन नेत्रदिपक यश संपादन केलेली अहमदपूर तालुक्यातील गुगदळ येथील विद्यार्थिनी कु. शिवानी महादेव देवकते हिला शैक्षणिक सहायता म्हणून श्री गणेश सेवाभावी संस्थेच्या वतीने २१ हजार रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली.

ज्येष्ठ पत्रकार दीपरत्न निलंगेकर, श्रीधर स्वामी, ज्योतिष विशारद कौस्तुभ सुवर्णकार यांच्या हस्ते कु. शिवानीस ही मदत राशी प्रदान करण्यात आली. यावेळी श्री गणेश सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष निवृत्ती टाळे ,संचालक बद्रीनाथ पिंपळडोहकर , कोषाध्यक्ष मरूप काझी, संतोष हल्लाळे , प्रमोद सुरवसे, रामानंद स्वामी, नवनाथ बाजगिरे यांचीही उपस्थिती होती.

निवृत्ती टाळे यांनी यावेळी बोलताना पित्याच्या निधनाचे दुःख बाजूला सारून शिक्षणाला प्राधान्य देण्याचे काम करणारी विद्यार्थिनी कु. शिवानी अतिशय हुशार आहे. तिने आतापासून पोलीस भरतीचीही तयारी सुरु केली आहे. भविष्यात एमपीएससीच्या माध्यमातून आणखी आपले उज्वल भवितव्य घडविण्याची तिची मानसिकता असल्याचे टाळे यांनी सांगितले. त्याचप्रमाणे शिवानीप्रमाणे होतकरू व हुशार विद्यार्थ्यांना मदत करण्याकामी आपली संस्था सदैव तयार असल्याचे नमूद केले. कु. शिवानी हिनेही आपण जीवनात यशस्वी होण्यासाठी कोणत्याही कष्टाचा सामना करण्याची तयारी ठेवल्याचे सांगितले.

## लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलमध्ये जलशक्ती पंधरवड्याची सुरुवात

**तभा वृत्तसेवा**



**लातूर दि. २५ एप्रिल :** लातूर परिसरातील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुल मध्ये जलशक्ती पंधरवड्याची मोठ्या उत्साहात सुरवात करण्यात आली.

सर्व प्रथम शाळेतील विद्यार्थ्यांनी या उपक्रमाची सुरवात प्राचार्या रुपाली कुलकर्णी, शाळेचे समन्वयक रौफ शेख, शाळेच्या समन्वयिका रुपाली कोकाटे, नम्रता झांबरे, प्रियांका नागलबोने, विद्या पाटील, संगीता शेटे, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये जल शपथ घेऊन पाणी वाचवण्याचा संकल्प करून केली.

शाळेतील सर्व विद्यार्थी व शिक्षिका, शिक्षक व शिक्षेत्तर कर्मचारी यांनी जलशक्ती पंधरवड्याच्या उपक्रमाच्या पहिल्या दिवशी शाळांमध्ये प्रार्थना सभेच्या वेळी पाणी

जपून वापरण्याची सामूहिक शपथ घेतली. या उपक्रमामागील शाळेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये पाणी बचतीची सवय लावणे हा आहे.

यानिमित्ताने शाळेमध्ये विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, याचबरोबर कृतीशील उपक्रम सुद्धा राबविण्यात येणार आहेत.

या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना दररोज त्यांनी घरी पाण्याचा वापर कसा कमी केला याची नोंद ठेवण्यास सांगितले आहे. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी संपूर्ण कुटुंबाला सहभागी करून घ्यायचे आहे. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यासोबत शाळेचे अध्यक्ष श्रीकृष्ण लाटे, कविता लाटे, शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सहभाग असणार आहे.

## शिक्षक पदोन्नती अन् समायोजन प्रक्रिया तत्काळ स्थगित करा ; सीईओंना साकडे



**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २५ एप्रिल :** राज्य शासनाने जनगणनेच्या कामासाठी शिक्षकांच्या बदल्या रद्द केल्या आहेत, त्याच धर्तीवर जिल्हा परिषद स्तरावर राबविल्या जाणाऱ्या शिक्षक समायोजन आणि पदोन्नती प्रक्रियेलाही स्थगिती द्यावी, अशी मागणी शिक्षक संघटनांच्या वतीने करण्यात आली आहे. ही प्रक्रिया घाईगडबडीत राबविल्यास उच्च न्यायालयात दाद मागण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

ग्रामविकास विभागाने १७ एप्रिल २०२६च्या पत्राद्वारे जनगणनेच्या कामाचे गांभीर्य लक्षात घेऊन २०२६मधील शिक्षक बदल्या रद्द केल्या आहेत. समायोजन आणि पदोन्नती प्रक्रियेतही शिक्षकांना एका शाळेतून दुसऱ्या शाळेत जावे लागते. सध्या शिक्षक जनगणनेच्या कामात व्यस्त आहेत. अशा परिस्थितीत समायोजन केल्यास अनेक शिक्षकांना तालुक्याबाहेर जावे लागेल. विशेष म्हणजे, येत्या मे ते जुलै २०२६ या काळात जिल्ह्यातून सुमारे ४०० शिक्षक सेवानिवृत्त होणार आहेत. जनगणनेनंतर ही रिक्त पदे उपलब्ध होतील, तेव्हाच समायोजन करणे सर्वांच्या सोयीचे ठरेल, असे महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष शरद हडगे यांनी सांगितले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार पदोन्नतीसाठी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) अनिवार्य करण्यात आली आहे. राज्य शासनाने या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेकडे मार्गदर्शन मागवले आहे. मात्र, त्याबाबतचा अभिप्राय अद्याप प्रलंबित आहे. तसेच २०१३च्या अगोदर सेवेत असलेल्या शिक्षकांना टीईटी परीक्षेत सूट देण्यासंबंधीची न्यायालयात सुनावणी सुरू आहे. त्यामुळे तो निर्णय आल्यानंतर पदोन्नतीची प्रक्रिया राबविल्यास उचित होईल, असे संघटनेचे म्हणणे आहे. टीईटी उत्तीर्णतेसाठी दोन वर्षांची मुदत सप्टेंबर २०२७मध्ये संपणार आहे. तोपर्यंत जनगणनाही पूर्ण होईल. आता घाईगडबडीने पदोन्नती राबवली, तर अनेक सेवाज्येष्ठ शिक्षकांवर अन्याय होण्याची शक्यता आहे. तसेच सध्या या विषयावर न्यायालयात अनेक याचिका प्रलंबित असून, त्यांचा निर्णय येईपर्यंत जिल्हा परिषद स्तरावर कोणतीही पदोन्नती प्रक्रिया राबवू नये, असे शिक्षक मेनेने जिल्हाध्यक्ष दद्यो यांनी सांगितले

## गुरूगौरव पुरस्कार सोहळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २५ एप्रिल :** महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद जिल्हा शाखा लातूरच्या वतीने जिल्हा स्तरीय शिक्षण परिषद, गुरु गौरव पुरस्कार व उपक्रमशिल शाळा यांचा सन्मान सोहळा पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे प्रांत अध्यक्ष मधुकर उन्हाळे प्रांताध्यक्ष हे होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते झले. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार विक्रम काळे, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, भाजपा गटनेते रामचंद्र तिरुके, महिला बालकल्याण समितीच्या सभापती शिवकन्या गोडभरले, नगराध्यक्ष शोभाताई आकनगिरे, प्राचार्या भागीरथी गिरी, सभापती गटशिक्षणाधिकारी, भुजंग शिंदे, अंकुश नाडे उपस्थितीत होते. जिल्ह्यातील आदर्श गटविकास अधिकारी, प्राचार्य, प्रशासन अधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, अंगणवाडी कार्यकर्ती, मदतनीस, प्राथमिक, माध्यमिक अशा ७१ शिक्षकांचा गुरु गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच १२ उपक्रमशील आदर्श शाळेचा मान्यवरांच्या हस्ते



सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा अध्यक्ष मच्छिंद्र गुरमे यांनी तर सुरेख सूत्रसंचालन अनिता येलमटे यांनी केले. आभार प्रदर्शन अरुणा कांदे यांनी केले.


### जाहीर प्रगटन

~~लातूर जिल्हा परिससातील तमाम जनतेस या~~ जाहिर प्रगटना द्वारे सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकार १) हेमंत वाल्मिक बोयणे, रा. कातपूर, ता.जि. लातूर आणि २) किशोरकुमार प्रकाश बोयने, रा. चिंचोली (भ.), ता. निलंगा जि. लातूर यांनी मला दिलेल्या माहिती व कागद पत्रावरून व वकिल म्हणून अधिकृत केले वरुन सर्व जनतेस खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देत आहे.

माझे पक्षकार यांना सुदर्शन प्रल्हाद चामे, रा. चिखली, ता.अहमदपुर जि.लातूर यांनी खरेदीखत दस्त डे.बु.नं लतर १ २७८४/२०२६, दि.२७/०३/२०२६ ईसवी अन्वये खरेदी मालकीचा व कब्जे वहिवाटीचा प्लॉट मौजे. सिकंदपुर, ता. जि.लातूर येथील जमीन गट नंबर २९ पैकीचा एन.ए झालेला एन.ए नंबर २०१२/जे.एम.बी/लातूर/सि.आर २४२, दि.१४/०९/२०१२ ई. अन्वये मे.सब डिव्हीजनल ऑफिस, लातूर यांनी मंजूर केलेला प्लॉट याचा लेआऊट नंबर सिडको लातूर सिडको/प्लॅनिंग/एल.टी.आर/२०१२/३८७, दि.०५/०९/२०१२ ई. अन्वये मे. सिडको ऑफिस, लातूर यांनी मंजूर केलेल्या पैकीचा प्लॉट नंबर २९ पुर्ण याचा ग्रा. पं. मिळकत नंबर १०८८ असून याची लांबी दक्षिण उत्तर १३.५० मी. व रूंदी पूर्व पश्र्चिम १० मी. असून याची एकूण क्षेत्रफळ १३५ चौ.मी. (१४५२.६ चौ.फुट) आहे.

याची चतुः सीमा खालीलप्रमाणे :-

पुर्वेस प्लॉट नंबर ०९, पश्चिमेस प्लॉट नंबर ११, दक्षिणेस सुभाष विश्बंभर सुरवसे यांची जमीन, उत्तरेस १२ मी. रुंदीचा रस्ता.

येणे प्रमाणे वरील चतुः सीमेच्या आतील मिळकत विद्यमान मालकाकडुन लेखी करार करुन घेऊण, इस्सारापोटी काही रक्कम माझे पक्षकाराकडुन स्विकारुन सदरची मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम असल्याची हमी माझे पक्षकारास दिली आहे. तरी सदर मिळकती बाबत जर कोणाचा उजर, आक्षेप, हितसंबंध, हक्कसंबंध, कर्जबोजा, गहाणखत, बक्षीसपत्र, कोर्टडिग्री, मृत्युपत्र, तारण, लीज, शेजाऱ्याचा वाद, शासकिय अथवा निमशासकिय कर्ज, न्यायालयीन वाद असतील तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून सात (०७) दिवसाच्या आत माझे खालील कार्यालयीन पत्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी उजर / आक्षेप नोंदवावा मुदतीत जर कोणाचा उजर/आक्षेप नाही आल्यास सदरची मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम आहे असे गृहीत धरुन माझे पक्षकार सदर मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत मूळ मालकाकडून आपल्या हक्कात करुन घेतील व त्यानंतर येणारे आक्षेप माझे पक्षकारावर बंधणकारक राहणार नाहीत याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

दिनांक २५/०४/२०२६
तर्फे ॲड. अशोक ज्ञा. लोखंडे
नोटरी भारत सरकार.
शाहू चौक, लातूर
मो नं.९४२१९ ८६४९५

जाहीर प्रगटन देणार
१) हेमंत वाल्मिक बोयणे, रा. कातपूर,
२) किशोरकुमार प्रकाश बोयने,
रा. चिचोली (भ.), ता. निलंगा जि. लातूर
मो. नं.८७९३७५१४४८/९६०४११८१२९

तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### हजूर साहिब नांदेड - हजरत निजामुद्दीन एक्सप्रेस उशिरा सुटणार

**परभणी,/प्रतिनिधी-** हजूर साहिब नांदेड येथून सुटणारी हजूर साहिब नांदेड - हजरत निजामुद्दीन एक्सप्रेस रेल्वे गाडी उशिरा सुटणार आहे, अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड येथील जनसंपर्क विभागाने दिली.

गाडी क्रमांक ०७६२१ हजूर साहिब नांदेड - हजरत निजामुद्दीन एक्सप्रेस ही गाडी २५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ०८:४५ वाजता सुटणार होती. मात्र ही गाडी ३६० मिनिटे उशिराने म्हणजेच दुपारी १४:४५ वाजता सुटेल. ही गाडी लिंक ट्रेन क्रमांक ०७७०२ एक्सप्रेस ४८४ मिनिटे उशिराने धावत असल्यामुळे उशिरा सुटणार आहे, असे रेल्वे प्रशासनाने म्हटले.

### पूर्णा डिपोवरील वॅगन तपासणीत वाढ; नांदेड विभागाची मालवाहतूक कार्यक्षमता बळकट

**परभणी,/प्रतिनिधी :** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने वित्तीय वर्ष २०२५-२६ दरम्यान पूर्णा डिपो येथे वॅगन तपासण्यांची संख्या वाढवत मालवाहतूक कार्यक्षमतेत उल्लेखनीय प्रगती साधली आहे. सुधारित कार्यपद्धती आणि सक्षम देखभाल व्यवस्थेमुळे विभागाने हा महत्त्वाचा टप्पा गाठला आहे.

पूर्णा डिपोवरील वॅगन तपासण्यांची एकूण संख्या २०२४-२५ मध्ये २४८ होती, ती २०२५-२६ मध्ये वाढून २८२ वर पोहोचली आहे. विशेष म्हणजे प्रीमियम वॅगन तपासण्यांमध्ये लक्षणीय वाढ नोंदवली गेली असून, मागील वर्षी ५५ असलेली ही संख्या यंदा १५८ पर्यंत वाढली आहे. प्रीमियम तपासण्या म्हणजे अधिक जलद आणि सखोल तपासणी प्रक्रिया होय. यामुळे वॅगन कमी वेळेत सेवेसाठी तयार होतात आणि उच्च दर्जाचे सुरक्षा व गुणवत्ता मानक कायम राखले जातात. परिणामी मालगाड्यांची उपलब्धता वाढून त्यांचा टर्नअराउंड वेळ कमी झाला आहे आणि एकूण मालवाहतूक व्यवस्थेत गती आली आहे. या सुधारणेमुळे परिसरातील उद्योग आणि मालवाहतूक ग्राहकांना अधिक विश्वासार्ह व कार्यक्षम वाहतूक सुविधा उपलब्ध होत असून स्थानिक लॉजिस्टिक्स व्यवस्थेला चालना मिळत आहे. परिणामी प्रदेशाच्या आर्थिक विकासालाही याचा सकारात्मक हातभार लागत आहे.

नांदेड विभागाच्या या यशामागे मालवाहतूक सेवा अधिक सक्षम करण्याचा, कार्यक्षमता वाढवण्याचा आणि ग्राहकाभिमुख रेल्वे सेवा पुरवण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न दिसून येतो. भविष्यातही अशाच प्रकारे नवोन्मेषी उपाययोजना राबवत पायाभूत सुविधा मजबूत करण्याचा विभागाचा मानस आहे.

### वाचन संस्कृती जोपासणे काळाची गरज : डॉ. रामेश्वर नाईक : गणेश वाचनालयात 'जागतिक पुस्तक दिन' उत्साहात साजरा

**परभणी,/प्रतिनिधी :** ग्रंथ हेच खरे गुरु असून वाचन संस्कृती जोपासणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध विचारवंत डॉ. रामेश्वर नाईक यांनी केले.

जागतिक पुस्तक दिनानिमित्त २३ एप्रिल रोजी येथील गणेश वाचनालयात सामुहीक पुस्तक वाचन आणि वाचकांना ग्रंथभेट उपक्रम राबविण्यात आला. या निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शैलेश मंडलिक होते. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. वाचनालयाच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ. नाईक यांनी तंत्रज्ञानाच्या युगातही पुस्तकांचे महत्त्व अधोरेखित केले. मोबाईलच्या वापरातून मिळणाऱ्या तात्पुरत्या मनोरंजनापेक्षा पुस्तक वाचनातून मिळणारा आनंद अधिक सखोल आणि समाधानकारक असतो. विद्यार्थ्यांनी नियमितपणे अवांतर वाचनाची सवय लावून घेतल्यास त्यांच्या विचारसरणीत व्यापकता येते आणि व्यक्तिमत्व अधिक प्रगल्भ बनते, असे ते म्हणाले. अध्यक्षीय समारोपात मंडलिक यांनी वाचनालयाच्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. प्रत्येक घरात छोटेसे ग्रंथालय असावे, असेही त्यांनी सुचवले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परभणी रीडर्स क्लबचे संस्थापक अनुराज रासकटला यांनी केले. त्यांच्या प्रभावी शैलीत त्यांनी पुस्तकांचे मानवी जीवनातील महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमाला विद्यार्थी व पुस्तकप्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. तसेच अभ्यासिकेतून शासकीय पदावर निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### बीएससी नर्सिंग परीक्षेत परभणी नर्सिंग कॉलेजचा शंभर टक्के निकाल

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील धनेश्वरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित परभणी नर्सिंग कॉलेजने बीएससी नर्सिंग परीक्षेत यंदाही शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून अनेक विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवत महाविद्यालयाचा नावलौकिक अधिक उंचावला आहे.

आमदार डॉ. राहुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या या नर्सिंग कॉलेजने मागील काही वर्षांपासून सातत्यपूर्ण शंभर टक्के निकालाची परंपरा जपली आहे. यंदाही त्याच परंपरेला अनुसरून विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत यशाची नवी नोंद केली आहे. या यशाबद्दल आमदार डॉ. राहुल पाटील यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. एस. आरती यांनी या यशाचे श्रेय विद्यार्थ्यांच्या मेहनतीला आणि प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाला दिले. भविष्यातही अशीच यशस्वी परंपरा कायम ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. तसेच परभणी मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता व संचालक डॉ. प्रमोद शिंदे यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत परभणीमध्ये आरोग्य क्षेत्रासाठी प्रशिक्षित व कुशल नर्सिंग मनुष्यबळ तयार होणे ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. या निकालामुळे त्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल पडत असल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान, महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांच्या यशाचा गौरव करण्यात आला.

### डॉ. सिद्धार्थ हत्तीअंबिरे यांची काँग्रेस अनुसूचित जाती विभागाच्या राष्ट्रीय समन्वयकपदी नियुक्ती

**परभणी,/प्रतिनिधी :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष तथा अनुसूचित जाती विभागाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. सिद्धार्थ हत्तीअंबिरे यांची काँग्रेस पक्षाच्या अनुसूचित जाती विभागाच्या राष्ट्रीय समन्वयकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय जनरल सेक्रेटरी के. सी. वेणुगोपाल यांनी पत्राद्वारे ही नियुक्ती जाहीर केली.

डॉ. हत्तीअंबिरे यांनी पक्षात विविध पदांवर कार्य करताना संघटन बळकटीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभागाच्या प्रदेशाध्यक्षपदाच्या कार्यकाळात त्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावत अनेक उपक्रम यशस्वीपणे राबवले. गेल्या अनेक वर्षांपासून त्यांनी पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले असून विविध सामाजिक व संघटनात्मक कार्यक्रमांद्वारे कार्यकर्त्यांना सक्रिय केले.

पक्षश्रेष्ठींनी त्यांच्या या कामाची दखल घेत त्यांची राष्ट्रीय स्तरावर निवड केली असल्याचे मानले जात आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे अनुसूचित जाती विभागाच्या कार्याला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# महानगरपालिकेच्या ११ समित्यांची बिनविरोध निवड; ८ महिला सभापती : स्थायी समिती सभापती पदी प्रतिभा सरोदे

**परभणी,/प्रतिनिधी-** महानगरपालिकेच्या विविध समित्यांच्या सभापती निवडीची प्रक्रिया आज शुक्रवार २४ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता बी. रघुनाथ सभागृहात पार पडली. यावेळी ११ समित्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. विशेष म्हणजे, निवड झालेल्या ११ पैकी ८ सभापती महिला असून, महानगरपालिकेत महिलांना नेतृत्वाची संधी मिळाली आहे.

या वेळी पिठासीन अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण उपस्थित होते, तर आयुक्त नितीन नार्वेकर, नगरपालिका प्रशासन प्रमुख महेश गायकवाड, नगरसचिव विकास रत्नपारखे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. निवडणूक अधिकाऱ्यांनी सर्व ११ समित्यांची निवड बिनविरोध झाल्याची घोषणा केली. महापौर सय्यद इकबाल सय्यद खाजा व उपमहापौर गणेश देशमुख यांच्या उपस्थितीत नवनिर्वाचित सभापतींची नावे जाहीर करण्यात आली.

स्थायी समिती सभापती म्हणून प्रतिभा अतुल सरोदे, प्रभाग समिती 'अ' सभापती रईसखान सरफराज खान, प्रभाग समिती 'ब' सभापती खान मुसद्दीकखान नुरूल्ला खान, प्रभाग समिती 'क' सभापती तबस्सुम वसीम शेख यांची निवड झाली. गलिच्छ वस्ती निर्मूलन, घरबांधणी व समाजकल्याण समिती सभापती म्हणून राजेश शंकरराव रणखांबे, महिला व बालकल्याण समिती सभापती म्हणून अश्विनी अमोल जाधव, स्थापत्य समिती सभापती म्हणून सायरा बेगम अलीमोद्दीन, वैद्यकीय व सहाय्य आरोग्य समिती सभापती म्हणून अबोली अनिल कांबळे, विधी व महसूल वाढ समिती सभापती म्हणून रुखसाना बेगम सय्यद अब्दुल हमीद जागीरदार, शहर सुधार समिती सभापती म्हणून शुभांगी शुभम पाष्टे, तर माध्यमिक, पूर्वमाध्यमिक व तांत्रिक समिती सभापती म्हणून शमशाद बेगम सय्यद इलाही यांची निवड करण्यात आली.

या सर्व नवनिर्वाचित सभापतींचा जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, मनपा आयुक्त नितीन नार्वेकर, महापौर सय्यद इकबाल तसेच उपमहापौर गणेश देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी नूतन स्थायी समिती सभापतींनी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व स्व. बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन केले.

नवनिर्वाचित सभापतींनी शहरातील नागरिकांचे मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. या प्रसंगी खा. संजय जाधव, आ. राहुल पाटील, गटनेते दिलीप ठाकूर यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.



### उपमहापौरांकडून प्रभाग समिती 'ब' कार्यालयाची पाहणी; अभिलेख सुरक्षिततेवर भर

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिकेचे उपमहापौर गणेश देशमुख यांनी प्रभाग समिती 'ब' कार्यालयातील जनगणना विभाग व अभिलेख विभागाची पाहणी करून कामकाजाचा आढावा घेतला.



यावेळी सहायक आयुक्त अलकेश देशमुख, क्रीडा व सांस्कृतिक विभाग प्रमुख राजकुमार जाधव, मुख्य आरोग्य अधिकारी करुण गायकवाड तसेच अभिलेख विभाग प्रमुख अनिल देशमुख उपस्थित होते. पाहणीदरम्यान अभिलेख विभाग प्रमुखांनी अभिलेख कक्षाची स्थिती उपमहापौरांना दाखवून दिली. कक्षाचे छत जिर्ण झाले असून पावसाळ्यात पाण्याची गळती होण्याची शक्यता असल्याने महत्त्वाचे अभिलेख नष्ट होण्याचा धोका असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. तसेच पावसाळ्यापूर्वी अभिलेख सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या पार्श्वभूमीवर उपमहापौरांनी सुरू असलेल्या रेकॉर्ड स्कॅनिंगच्या कामाची गती वाढविण्याच्या सूचना दिल्या. तसेच आयुक्तांची भेट घेऊन अभिलेख कक्षातील सर्व कागदपत्रे पावसाळ्यापूर्वी सुरक्षित ठिकाणी हलविण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी दिले. अभिलेखांचे संवर्धन आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यावर यावेळी विशेष भर देण्यात आला.

## पंधरा दिवसांत पीक विमा द्या, अन्यथा आंदोलन करु : आमदार डॉ. राहुल पाटील यांचा इशारा : कोरड्या पिक कापणी प्रयोगाचा अहवाल तातडीने पाठवण्याच्या सूचना

**परभणी,/प्रतिनिधी-** खरीप हंगाम २०२५ मध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या प्रचंड नुकसानीनंतरही शेतकऱ्यांना पीक विम्याची भरपाई मिळालेली नसल्याने संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर आमदार डॉ. राहुल पाटील यांनी पंधरा दिवसांच्या आत शेतकऱ्यांना विमा रक्कम द्यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा पीक विमा कंपनी व प्रशासनाला दिला आहे.



जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्यासोबत झालेल्या चर्चेदरम्यान आमदार पाटील यांनी कोरड्या अवस्थेतील पिक कापणी प्रयोगाचा अहवाल तातडीने संबंधित कंपनीकडे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. त्यांनी सांगितले की, जिल्ह्यातील लाखो शेतकऱ्यांनी पीक विमा घेतला असताना देखील अद्याप त्यांना भरपाई मिळालेली नाही, ही अत्यंत गंभीर बाब आहे.

खरीप हंगामात सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात सतत पाऊस झाल्यामुळे जमिनीत पाणी साचले होते आणि पिके ओलसर अवस्थेत होती. या परिस्थितीत शासनाने ओल्या पिकांसोबतच कोरड्या पिकांच्या कापणी प्रयोगालाही मान्यता देण्याच्या सूचना केल्या होत्या. मात्र, विमा कंपनीने या सूचनांचा चुकीचा अर्थ लावत तांत्रिक कारण पुढे करून दोन वेगवेगळे अहवाल कसे ग्राह्य धरायचे, असा मुद्दा उपस्थित केला आणि परभणी जिल्ह्याचा विमा प्रस्ताव मंजूर केला नाही.

यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊनही शेतकरी भरपाईपासून वंचित राहिले आहेत. विमा कंपनीने तांत्रिक बाबींचा आधार घेत पळवाट काढल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. आमदार पाटील यांनी स्पष्ट केले की, कोरड्या पिक कापणीचा अहवाल ग्राह्य धरून तातडीने विमा भरपाई देण्यात यावी. दरम्यान, या इशाऱ्यानंतर जिल्हा प्रशासनाकडून त्वरीत अहवाल पाठवला जाईल आणि शेतकऱ्यांना लवकरच पीक विम्याची रक्कम मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## परभणी-मनमाड रेल्वे मार्गावर अभियांत्रिकी कामामुळे काही गाड्यांच्या वेळापत्रकात तात्पुरते बदल तर काही गाड्या अंशतः रद्द

**परभणी,/प्रतिनिधी-** :दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील परभणी-मनमाड या महत्त्वाच्या मार्गावर पोटुल-दौलताबाद दरम्यान असलेल्या लेव्हल क्रॉसिंग क्रमांक ४१ येथे आरएच गर्डर बसविणे व काढणे या अभियांत्रिकी कामासाठी ओव्हरहेड वीजपुरवठा (ओएचई) पॉवर ब्लॉकसह ट्रॅफिक ब्लॉक घेण्यात येणार आहे. या कामामुळे काही गाड्यांच्या वेळापत्रकात तात्पुरते बदल करण्यात आले असून काही गाड्या अंशतः रद्द तर काही उशिराने धावणार आहेत, अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड येथील जनसंपर्क विभागाने दिली.

२५ एप्रिल आणि २ मे २०२६ रोजी प्रत्येकी तीन तासांचे दोन ब्लॉक



घेतले जाणार आहेत. या कालावधीत रेल्वे वाहतुकीवर परिणाम होणार असून प्रवाशांनी आपल्या प्रवासाचे नियोजन त्यानुसार करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या कामामुळे गाडी क्रमांक १७६८८ धर्माबाद-मनमाड मराठवाडा एक्सप्रेस ही २५ एप्रिल व ०२ मे रोजी छत्रपती संभाजीनगर ते मनमाड दरम्यान अंशतः रद्द राहील. ही गाडी त्या दिवशी धर्माबाद ते छत्रपती संभाजीनगर या मार्गावरच धावेल. त्याचप्रमाणे गाडी क्रमांक १७६८७ मनमाड-धर्माबाद मराठवाडा एक्सप्रेस ही देखील मनमाड ते छत्रपती संभाजीनगर दरम्यान अंशतः रद्द राहील आणि छत्रपती संभाजीनगर ते धर्माबाद या मार्गावर धावेल.

दरम्यान, गाडी क्रमांक १२०७१ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-हिंगोली जनशताब्दी एक्सप्रेस ही पोटुल स्थानकावर सुमारे १५ मिनिटे थांबवण्यात येणार आहे, त्यामुळे या गाडीचा प्रवास काही प्रमाणात उशिरा होण्याची शक्यता आहे, असेही रेल्वे प्रशासनाने म्हटले आहे.

### सार्वजनिक बांधकाम विभागात महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती उत्साहात



**परभणी,/प्रतिनिधी:** क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयात गुरुवारी २३ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या जयंती महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात पुज्यभन्ते मोग्गलायन व पुज्यभन्ते एस. संघमित्र यांनी धम्मदेशनाद्वारे उपस्थितांना मार्गदर्शन केले. समाजातील समता, बंधुता आणि शिक्षणाचे महत्त्व यावर त्यांनी आपल्या प्रवचनातून प्रकाश टाकला.


कार्यक्रमाला सार्वजनिक बांधकाम विभागाचे चौधरी, टेहरे मॅडम, कुपटेकर, लहामगे, शेळके, उक्कडगावकर, कुलकर्णी, माकळे, प्रदीप वावळे तसेच संयुक्त जयंती उत्सव समितीचे बबन अंभोरे, मारुती शिंदे, राजू पाचपोर, आकाश खिल्लारे आदींसह विभागातील अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्षा गेव्हारे मॅडम यांनी केले, तर आभार प्रदर्शन अभियंता दीपक कुपटेकर यांनी मानले.

## सामंजस्य करारातून आधुनिक तंत्रज्ञानाचा शेतकऱ्यांना लाभ : कुलगुरू मणि

### वनामकृवि व पोकरा प्रकल्प यांच्यात सामंजस्य करार; हवामान बदलास सक्षम शेतीसाठी संयुक्त उपक्रम

**परभणी ,/प्रतिनिधी:** बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब करणे ही काळाची गरज बनली आहे. नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन करत उत्पादनक्षमतेत वाढ साध्य करण्यासाठी आधुनिक व नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर अत्यावश्यक आहे. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून संशोधन, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि कौशल्य विकासाला चालना मिळणार असून, शेतकऱ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञान, सुधारित शेती पद्धती व दर्जेदार साधनसामुग्रीचा (इनपुट्सचा) लाभ मिळेल. यामुळे केवळ कृषी उत्पादनक्षमता वाढणार नाही तर शेती अधिक लाभदायक, टिकाऊ आणि हवामान बदलास प्रतिरोधक बनण्यास मोठी मदत होईल, असे मत कुलगुरु प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी केले.

मराठवाड्यातील शेती अधिक शाश्वत व हवामान बदलास सक्षम करण्याच्या दृष्टीने वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी आणि नानाजी देशमुख कृषि संजिवनी प्रकल्प - पोकरा यांच्यात २३ एप्रिल रोजी मुबई येथे सामंजस्य करार करण्यात आला आहे. हा करार महाराष्ट्रातील प्रमुख पिक पद्धतींमध्ये संसाधन उत्पादकता वाढविण्यासाठी आणि हवामान



बदलास प्रतिकारक्षमता सुधारण्यासाठी संरक्षणात्मक शेती या महत्त्वपूर्ण विषयावर आधारित असून, राज्यातील प्रमुख पिक पद्धतींमध्ये संसाधनांचा कार्यक्षम वापर व हवामान बदलाशी सामना करण्याची क्षमता वाढविणे हा यामागील मुख्य उद्देश आहे. वर्ष २०२६ पासून हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

मुंबई येथे झालेल्या या करारावर वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि आणि पोकरा प्रकल्पाच्या प्रकल्प संचालिका श्रीमती मीनल करणवाल (भाप्रसे) यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी विद्यापीठाचे शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार, कृषि रसायन आणि मृदा शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ हरिहर कौसडीकर दोन्ही संस्थांतील वरिष्ठ अधिकारी व तज्ज्ञ उपस्थित होते. या कराराच्या माध्यमातून मृदासंवर्धन, जलव्यवस्थापन, कमी खर्चिक व पर्यावरणपूरक शेती पद्धती, तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी तांत्रिक मार्गदर्शन व संशोधनात्मक सहकार्य करण्यात येणार आहे. पोकरा प्रकल्पाच्या वतीने या सहकार्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना हवामान अनुकूल शेती पद्धती आत्मसात करण्यास चालना मिळेल, असा विश्वास कुलगुरुंनी व्यक्त केला.

हा करार राज्यातील कृषी क्षेत्रासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरणार असून, संशोधन व प्रत्यक्ष शेती यांच्यातील दुवा अधिक मजबूत होणार आहे.

## अग्रलेख...

# नतद्रष्ट, नाठाळ आणि निर्ढावलेला...

अमेरिका हा जगातील सर्वांत जुना लोकतांत्रिक देश आणि वर्तमानातली एकमेव जागतिक महाशक्ती. आर्थिक, लष्करी आणि औद्योगिक प्रगतीत अमेरिकेची बरोबरी कुणीही अद्याप करू शकलेले नाही. सर्व क्षेत्रांतील अद्ययावत तंत्रज्ञान त्या देशाकडे आहे. अमेरिकेचा व्हिसा हा जगातील सर्वाधिक शक्तिशाली व्हिसा समजला जातो. मानवी मूल्ये तसेच कायदेशीर आणि घटनात्मक अधिकारांचे जेवढे जतन आणि संवर्धन अमेरिकेत आतापर्यंत होत होते, तेवढे खचितच जगातील अन्य कोणत्याही देशात होत असावे. पण गेल्या काही दिवसात अमेरिकेची ही ओळख पुसून टाकण्याचे 'पवित्र' कार्य त्या देशाच्या राष्ट्रपतींनीच हाती घेतले आहे. डोनाल्ड ट्रम्प हे त्यांचे नाव. त्यांच्या काळात मानवतेचे मारेकरी अशी अमेरिकेची नवी ओळख जगात निर्माण झाली आहे. ट्रम्प यांची वागणूक अतिशय विचित्र, विक्षिप्त, बेमुर्वत आणि आढ्यताखोर आहे. आपल्या वागणुकीने त्यांनी शत्रूंना आणखी कट्टर शत्रू केले आणि पारंपरिक मित्रांनाही शत्रू बनण्यास भाग पाडले.

रेडियो होस्ट मायकल सॅवेज यांची एक भारतविरोधी पोस्ट ट्रम्प यांनी रिपोस्ट केली. यात सॅवेज यांनी भारतविरोधी विषारी फुत्कार सोडले होते. सॅवेज यांची पोस्ट ट्रम्प यांनी रिपोस्ट केली, याचा अर्थ सॅवेज यांच्या भारतविरोधी मताशी आणि भूमिकेशी ट्रम्प महाशय सहमत आहेत, असाच निघतो. एरवीही ट्रम्प कधी काय बोलतील वा त्यांच्या तोंडातून कशी आणि कोणती मुक्ताफळे बाहेर पडतील, याचा अंदाज करता येत नाही. अमेरिकेला सभ्य आणि लोकशाहीवादी राष्ट्राध्यक्षांची उज्ज्वल परंपरा लाभली आहे. या सर्व राष्ट्राध्यक्षांनी अमेरिकेची मान उंचावली. एखादा अपवाद वगळता अमेरिकेचा प्रत्येक राष्ट्राध्यक्ष व्यक्ती म्हणूनही चांगल्या वळणाचा असे. ट्रम्प यांची तुलनाच पूर्वीच्या कुण्या राष्ट्राध्यक्षांशी करता येत नाही इतके हे महाशय 'थोर' निघाले. ट्रम्प यांनी आपल्या वाहियात आणि वाचाळ वक्तव्यांनी तसेच कृतीने स्वत:सोबत अमेरिकेची प्रतिष्ठाही पायदळी तुडवली. आंतरराष्ट्रीय समुदायाला वारंवार अडचणीत टाकले. आजपर्यंतच्या इतिहासात एवढा नतद्रष्ट, नाठाळ आणि निर्ढावलेला अध्यक्ष अमेरिकेला मिळाला नाही. अध्यक्ष म्हणून आपण काय बोलावे, कसे वागावे, याचा कोणताही मागमूस यांच्या वर्तनात नाही. एखादा वेडा इसम तरी बरा वागेल, एखादा विक्षिप्त किंवा टग्या माणूसही कदाचित बरे वर्तन करेल. त्यांनाही लाजविणारी भाषा जगाला सभ्यतेचे धडे देणाऱ्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वापरत आहेत. ट्रम्प यांनी आपल्या वागणुकीने समस्त अमेरिकी जनतेचीही मान खाली झुकवली आहे. आम्ही कोणते पाप केले, की म्हणून असा अध्यक्ष आमच्या पदरी पडला, अशी तक्रारही आता अमेरिकी जनता करू शकत नाही. कारण या जनतेनेच त्यांना दुसऱ्यांदा निवडून दिले. त्यांनी आपल्या चुकीची पुनरावृत्ती केली. अमेरिकेच्या विद्यमान प्रतिमा भंजनासाठी ट्रम्प जेवढे जबाबदार आहेत, तेवढीच अमेरिकेच्या मतदारांचीही जबाबदारी आहेच. आता किमान पावणेतीन वर्षे अमेरिकेन जनतेला ट्रम्प कितीही मान्य नसले, पटत नसले तरी सहन करावे लागणार आहे. अमेरिकन जनतेला एवढा काळ तरी हे न पटणारे सौभाग्य आपल्या माथ्यावर मिरवावे लागणार आहे.

'खोटं बोल पण रेटून बोल' यावर ट्रम्प यांचा विश्वास आहे. आपण जे बोलतो, त्यावर अमेरिकी जनता आणि जगाचा सहज विश्वास बसतो, असा त्यांचा समज आहे. खरे तर तो त्यांचा गैरसमज आहे. एव्हाना अमेरिकेची जनता आणि उर्वरित जगालाही ट्रम्प नावाची चीज किती विचित्र आणि फालतू आहे, हे कळून चुकले आहे. उचलली जीभ लावली टाळूला अशाच धर्तीची ट्रम्प यांची सर्व विधाने असतात. कधी महिला पत्रकाराला तुम्ही देखण्या आहात असे म्हणणे आणि कधी एखाद्याच्या मृत्यूची बातमी आली तर बरे झाले, तो गेला, असे उद्गार काढणे ही त्यांची सभ्यता. अशी कित्येक उदाहरणे सापडतील. जन्मजात नागरिकत्व अमेरिकेशिवाय दुसरा कोणताही देश देत नाही, असे ट्रम्प म्हणाले. पण जगातील ३६ देश त्यांच्या देशात जन्मलेल्याला नैसर्गिक स्वरूपात नागरिकत्व देतात, हे वास्तव ते लपवून ठेवतात. खोटे बोलताना आपण अमेरिकेसारख्या देशाचे अध्यक्ष आहोत, याचेही भान ट्रम्प यांना राहात नाही वा ते ठेवत नाहीत. अध्यक्षपदाचा ट्रम्प यांचा पहिला कार्यकाळ दुसऱ्या कार्यकाळापेक्षा खूप चांगला होता, असे म्हणावे लागते. दुसऱ्या कार्यकाळात ट्रम्प यांचे वर्तन आधीच मर्कट त्यात मद्य प्याला असे झालेले दिसते.

लहरी आणि विक्षिप्त वर्तन व वक्तव्यांमध्ये भर म्हणून ट्रम्प यांनी अमेरिकेतच नाही तर जगातही हिंसेचे तांडव सुरू केले. अमेरिकेने याआधीही जगातील अनेक लहान-मोठ्या देशावर आक्रमण करीत त्यांचा घास घेतला. अमेरिकेने आपल्या पाशवी महत्त्वाकांक्षेपोटी हातात छडी घेऊन जगाला धडा शिकविण्याचा प्रयत्न अनेकदा केला. ट्रम्प यांनी तर त्यात मोठीच आघाडी घेतली. अख्खे आखात त्यांनी संकटात टाकले. जगातील इतर देशांनाही त्रास दिला. अशा पद्धतीने जगात अशांतता निर्माण करणारे ट्रम्प शांततेच्या नोबल पुरस्कारावर दावा करतात, हा फारच मोठा विनोद म्हटला पाहिजे. जगातील सगळ्यात विकृत, विचित्र व विक्षिप्त राष्ट्रप्रमुख म्हणून एखादी स्पर्धा घेतली तर त्यात ट्रम्प यांची अव्वल नंबरवर निवड झाल्याशिवाय राहणार नाही. सामान्यपणे कोणत्याही देशाच्या राष्ट्रप्रमुखाला मुत्सद्देगिरीने वागावे लागते. मुत्सद्देगिरीची भाषा बोलावी लागते. खरा राजकीय नेता तोच असतो, ज्याला काय बोलावे, यापेक्षा काय बोलू नये, हे कळते. राजनयिक वा मुत्सद्यांनाही काय बोलावे यापेक्षा काय बोलू नये, हे कळायला हवे. आंतरराष्ट्रीय व्यवहाराचे काही पायंडे आहेत, तसे ते राष्ट्रप्रमुखपदावर बसलेल्या व्यक्तींनी कसे बोलावे, वागावे याबद्दलही आहेत. त्यांचा लवलेशही ट्रम्प यांच्या वर्तनात नाही. त्यांनी चीन आणि भारताबाबत नुकतेच जे विधान केले, त्याचा करावा तेवढा निषेध कमी आहे. चीन आणि भारत यांचा उल्लेख ट्रम्प यांनी 'नरकाचे प्रवेशद्वार' असा केला. या वक्तव्यातून ट्रम्प यांनी चीन आणि भारतातील जनतेचा घोर अपमान केला. चीन हा अमेरिकेचा मित्र नसला, तरी भारत हा अमेरिकेचा मित्र आहे. जेव्हा जेव्हा शक्य होते, तेव्हा भारताने अमेरिकेला पाठिंबा दिला. अमेरिकेचा जो गाडा आज आपल्याला सुरळीत चालल्यासारखा दिसतो त्यामागे अमेरिकेतील भारतीय नागरिकांचे मोठे योगदान आहे. अमेरिकेच्या समाजजीवनातून भारतीय नागरिक वगळले, तर अमेरिकेचा डोलारा खाली कोसळायला वेळ लागणार नाही. अशा देशाचा उल्लेख ट्रम्प यांनी नरकाचे प्रवेशद्वार असा केला, याबद्दल समस्त भारतीयांनी चवताळून उठले पाहिजे.

अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यात चीनने अमेरिकेविरुद्ध इराणला मदत केली. म्हणजे चीन त्या युद्धात अप्रत्यक्षपणे अमेरिकेच्या विरोधात उतरला. पण भारताने अशी कोणतीच भूमिका घेतली नाही. खरे तर इराणही भारताचा मित्रदेश आहे आणि अमेरिकाही मित्र आहे. भारताने या युद्धात कोणत्याही एका पक्षाची बाजू न घेता संतुलित आणि संयमी भूमिका घेतली, याची जाणीव अमेरिकेने ठेवायला हवी होती.

ट्रम्प यांच्या उन्मत्त आणि युद्धखोर मानसिकतेने अमेरिकेतील त्यांची लोकप्रियता झपाट्याने खाली घसरली आहे. जोपर्यंत ते अमेरिकेचे अध्यक्ष आहेत, तोपर्यंत ते स्वत:ची आणि अमेरिकेचीही जगातील प्रतिमा काळवंडणार आहेत आणि या ना त्या पद्धतीने विविध देशांना-समुदायांना संकटात टाकणार आहेत, हे नक्की. अमेरिकन जनतेच्या वतीने तिथल्या राजकारण्यांनी त्यांच्याविरुद्ध अविश्वास आणून त्यांना अध्यक्ष पदावरून पदच्युत केले पाहिजे. अन्यथा ट्रम्प अमेरिकेलाच नव्हे तर जगालाही महाग पडतील, हे नक्की. ▮

## यंगिस्तान


जयेश शत्रुघ्न मेस्त्री

# भाजपाला शोंदेश आणि दीदीला संदेश

पश्चिम बंगालच्या राजकारणात २०२६ च्या विधानसभा निवडणुकीकडे केवळ सत्तासंघर्ष म्हणून पाहता येणार नाही तर या निवडणुकीत बंगाली जनतेला प्रायश्चित्त करावं लागणार आहे. बंगालची भूमी ही हिंदू संस्कृतीसाठी ओळखली जाते. पण ज्या भूमीने राष्ट्रगीत आणि राष्ट्रीय गीत दिले, ज्या भूमीने आधुनिक काळात जिहादी अत्याचार पचवले, ती भूमी पुढे कम्युनिस्टांच्या ताब्यात गेली. कम्युनिस्ट, हिंदुत्व या दोन विरोधार्थी विचारधारा असल्या, तरी त्या 'विचारधारा' आहेत, हे मानावं लागेल. पण कम्युनिस्टांच्या अत्याचारातून मुक्त होण्याची गरज जेव्हा बंगालला भासली तेव्हा बंगाली जनतेने वरवर प्रादेशिक अस्मितेचा बुरखा पांघरलेल्या पण 'सत्ता' सोडून कोणतीच विचारधारा नसलेल्या ममता दीदीची निवड केली आणि इथेच बंगाली जनता फसली. दीदीने मा, माटी, मानुष अशी हाक दिली. प्रादेशिक अस्मिता ही अशी फसवी असते. दक्षिण भारतात ही फसवी अस्मिता अत्यंत प्रबळ आहे. महाराष्ट्राने मात्र या फसव्या अस्मितेला फारसा थारा दिला नाही. कारण मराठी माणसाच्या रक्तात हिंदवी स्वराज्य आहे.

आता बंगालमध्ये २३ एप्रिल रोजी झालेल्या पहिल्या टप्प्यातील १५२ मतदारसंघांतील मतदानाने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले आहे. सुमारे ९१.७८ टक्के इतके विक्रमी मतदान झाले आहे. हा बदलाचा आणि प्रस्थापित सत्तेविरुद्धच्या रोषाचा संकेत असल्याचे म्हटले जात आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पहिल्या टप्प्यानंतर केलेल्या दाव्यांनी बंगालच्या राजकारणात मोठी खळबळ उडवून दिली आहे. त्यांनी १५२ पैकी ११० जागा जिंकण्याचा विश्वास व्यक्त केला असून सर्वात महत्त्वाचे म्हणजे बंगालच्या इतिहासात पहिल्यांदाच एकही मृत्यू न होता निवडणूक पार पडल्याचे नमूद केले आहे. हे वक्तव्य अत्यंत घातक आहे. कारण बंगालमध्ये निवडणुकीच्या काळात अनेक मृत्यू होतात आणि हे मृत्यू म्हणजे राजकीय बळी असतात व सत्ताधारी पक्ष हा अत्याचार राजरोसपणे करीत असतो; मात्र स्वतःला पुरोगामी, संविधानप्रेमी म्हणवून घेणारे नालायक लोक टाळ्या वाजवत असतात.

पहिल्या टप्प्यात १५२ जागांसाठी मतदान झाले; ज्यामध्ये प्रामुख्याने उत्तर बंगाल आणि जंगल महाल या क्षेत्रांचा समावेश होता. उत्तर बंगाल हा गेल्या काही वर्षांपासून भाजपाचा बालेकिल्ला राहिला आहे, तर जंगल महालमध्ये तृणमूल आणि भाजपामध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळते. ९१.७८ टक्के मतदानाचा अर्थ असा होतो की, ग्रामीण भागातील मतदारांनी मोठ्या संख्येने बाहेर पडून आपला हक्क बजावला आहे. अमित शाहांनी केलेला ११० जागांचा दावा हा याच पृष्ठभूमीवर आधारित आहे. बंगालमध्ये निवडणुकीच्या काळात होणारा हिंसाचार हा नेहमीच चिंतेचा विषय राहिला आहे, परंतु यावेळी कडक सुरक्षा व्यवस्था आणि निवडणूक आयोगाच्या नियोजनामुळे हिंसाचार रोखण्यात यश आले, हे भाजपासाठी मोठे यश मानले जात आहे. यावेळच्या निवडणुकीत 'एसआयआर' म्हणजेच विशेष सघन पुनरीक्षण हा सर्वात मोठा 'गेम चेंजर' ठरला आहे. कलकत्ता उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली राबविण्यात आलेल्या या मोहिमेमुळे बंगालच्या मतदार यादीतील मोठ्या प्रमाणावरील त्रुटी दूर करण्यात आल्या. सुमारे ९० लाख नावे मतदार यादीतून वगळण्यात आली किंवा त्यांची पडताळणी करण्यात आली. या प्रक्रियेचा परिणाम असा झाला की, अनेक वर्षांपासून असलेल्या 'बोगस' मतदानावर लगाम लावला गेला. तृणमूल काँग्रेसने आरोप केला की, या प्रक्रियेत अल्पसंख्यक मतदारांना लक्ष्य करण्यात आले आहे, परंतु 'एसआयआर'मुळे मतदार यादी 'स्वच्छ' झाली असून याचा थेट फायदा भाजपाला मिळण्याची शक्यता आहे.





आता मुस्लिम मतदारांबाबत म्हणायचे झाले, तर पहिल्या टप्प्यात उत्तर बंगालमधील उत्तर दिनाजपूरसारखे काही जिल्हे वगळता मुस्लिम लोकसंख्येचे प्रमाण तुलनेने कमी आहे. या टप्प्यात प्रामुख्याने राजबंशी, आदिवासी आणि मागासवर्गीय मतदारांचा प्रभाव जास्त आहे. पहिल्या टप्प्यात मुस्लिमबहुल मतदारसंघांची संख्या सुमारे १५ ते २० च्या आसपास आहे. येथे भाजपाला हिंदू मतांच्या एकत्रीकरणाचा फायदा मिळण्याची अपेक्षा आहे. २९ एप्रिल रोजी होणाऱ्या दुसऱ्या टप्प्यात खरी कसोटी लागणार आहे. या टप्प्यात मुर्शिदाबाद, मालदा आणि दक्षिण २४ परगणा या जिल्ह्यांचा समावेश आहे, जे तृणमूल काँग्रेसचे बालेकिल्ले मानले जातात. या भागात मुस्लिम लोकसंख्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त असलेल्या मतदारसंघांची संख्या मोठी आहे. दुसऱ्या टप्प्यात सुमारे ४० ते ५० जागा मुस्लिमबहुल आहेत. मात्र, 'एसआयआर'मुळे या भागातील मतदार याद्यांमध्ये झालेला बदल आणि ओवेसी-कबीर (आम जनता उन्नयन पार्टी) युतीमुळे होणारी मुस्लिम मतांची फाटाफूट दीदींसाठी चिंतेची बाब ठरू शकते तसेच निवडणूक आयोगाचे शून्य सहनशीलता धोरण आणि १०० टक्के वेबकास्टिंगमुळे यावेळी बंगालमध्ये पारदर्शक निवडणूक होत आहे.

वरील बाबी लक्षात घेतल्या तर हे स्पष्ट होते की, बंगालची राजकीय हवा बदलत आहे. मात्र निवडणुकीचा दुसरा टप्पा भाजपासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. ओवैसींनी जर चमत्कार केला आणि दुसऱ्या टप्प्यातही ९० टक्के मतदान झाले. उर्वरित ५० टक्के जागांवर हिंदू मोठ्या प्रमाणात उतरले तर भाजपाला सत्तास्थापन करण्याची संधी मिळू शकते. पण अनेकांना हे जितकं सोपं वाटतंय तितकं सोपं नाही. ममता दीदीचं सर्वात मोठं शस्त्र म्हणजे भीती होय! जर भाजपा सत्तेत नाही आली तर भाजपा आपल्या कार्यकर्त्यांना व मतदारांना संरक्षण देऊ शकेल काय? ही भीती बंगाली जनतेच्या मनातून जोपर्यंत निघत नाही, तोपर्यंत बंगालमध्ये चमत्कार होणार नाही. पहिल्या टप्प्यात ९० टक्क्यांहून अधिक मतदान झाले. याचा अर्थ ही भीती काही प्रमाणात निघालेली आहे किंवा लोकांच्या मनात दीदीविषयी चीड आहे, असा होऊ शकतो. मागच्या निवडणुकीत भाजपाला ८० चा आकडा पार करता आला होता. बंगालच्या सत्तेवर विराजमान व्हायचे असेल तर २९४ पैकी १४८ जागा भाजपाला जिंकाव्या लागणार आहेत. म्हणजे भाजपाला आधीच्या ८० जागांवर हक्क सांगत सुमारे आणखी ७० जागा हव्या आहेत. म्हणूनच अमित शाह म्हणतात त्याप्रमाणे भाजपाला पहिल्या टप्प्यात ११० जागा जिंकाव्याच लागणार आहेत. कारण दुसरा टप्प्याचा सुमारे ५० टक्के भाग दीदीच्या हातात आहे. तरी पहिल्या टप्प्याचं मतदान पाहिलं की भाजपाला शोंदेश म्हणजेच मिठाई मिळण्याची शक्यता आहे आणि हा दीदीसाठी संदेश म्हणजेच एक सूचना आहे की, 'दीदी तुझी सत्ता आता डळमळीत झाली आहे.' येत्या ४ मे रोजी कळेल की, अमित शाह आणि नरेंद्र मोदी हे दीदीला आपल्या विजयाचा शोंदेश द्यायला जातील की...? ▮

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

विजय कुळकर्णी

# बुलढाणा जिल्ह्यात पर्यटन विकास करा

मागासलेला जिल्हा म्हणून विदर्भातील बुलढाणा जिल्हा ओळखला जातो. या जिल्ह्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. मात्र, सिंचनाच्या पुरेशा सुविधा नसल्याने कोरडवाहू शेतीचे प्रमाण जास्त आहे. पावसाच्या पाण्यावरच शेतकऱ्यांना अवलंबून राहावे लागते. शेतीला जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय काही शेतकरी करतात. पण, त्यांची संख्या अलिकडच्या काळात कमी झाली आहे. या जिल्ह्यात कोणताही मोठा उद्योग नाही. आमदार डॉ. संजय कुटे यांनी विधानसभेत कृषी उत्पादनांवर आधारित उद्योग बुलढाणा जिल्ह्यात उभारण्याकडे सरकारचे लक्ष वेधले होते. उद्योगांसोबतच पर्यटन क्षेत्रासाठी हा जिल्हा उपयुक्त ठरू शकतो.

बुलढाणा जिल्ह्यात जागतिक कीर्तीचे खाऱ्या पाण्याचे लोणार सरोवर आहे. हे सरोवर उल्कापातामुळे नैसर्गिकरीत्या तयार झाले आहे. त्यामुळे सरोवराचा अभ्यास व निरीक्षण करण्यासाठी देश-विदेशातील अभ्यासक व पर्यटक मोठ्या संख्येत लोणारला भेट देतात. सरोवरासोबतच या शहरात धारातीर्थ, हेमाडपंथी स्वामी मंदिर आदी ठिकाणे आहेत. लोणारपासून जवळच मेहकर तालुक्यात हिवरा आश्रम येथे स्वामी विवेकानंद आश्रम हे आध्यात्मिक केंद्र आहे. शुकदास महाराजांनी हा आश्रम स्थापन केला आहे. राज्यातील भाविकांचे हे श्रद्धास्थान आहे. या जिल्ह्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी राज्य सरकारने गेल्या कित्येक दिवसांपासून रखडलेला लोणार-हिवरा आश्रम हा सी-प्लेन प्रकल्प सुरू करण्याचा विचार केला आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या या निर्णयामुळे जिल्ह्यातील पर्यटन उद्योगाला चालना मिळून अर्थव्यवस्थेला नवी दिशा मिळणार आहे. यासाठी जागतिक स्तरावर निविदा मागविण्यात आल्या आहेत. खाजगी निविदाधारकांच्या माध्यमातून या प्रकल्पात ४६६ ते ४९० कोटींची गुंतवणूक होणे अपेक्षित आहे. सरकारवर कोणताही आर्थिक भार न पडता हा प्रकल्प कार्यान्वित केला जाणार असल्याचे सांगितले जात आहे. ९ ते १९ आसनी सिंगल किंवा टिन इंजीन विमाने हिवरा आश्रम ते लोणार सरोवर उड्डाण घेणार आहेत. यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील हिवरा आश्रम व लोणार ही दोन पर्यटनस्थळे जागतिक पर्यटन केंद्र म्हणून नावारूपाला येणार आहेत. लोणार सरोवर हे जगभरातील अभ्यासक, शास्त्रज्ञ आणि पर्यटकांचे आकर्षण केंद्र राहिले आहे.

याशिवाय श्री संत गजानन महाराजांच्या पावन वास्तव्याने पुनित झालेली शेगाव नगरी तीर्थक्षेत्र व पर्यटन केंद्र आहे. श्री गजानन महाराजांचे मंदिर हे भक्तांची सेवा, शिस्त, स्वच्छता साठी देशभरात प्रसिद्ध आहे. भक्तांना आजही श्रींचे अनुभव येतात. त्यामुळे भाविक मोठ्या संख्येत शेगावला येतात. मध्य रेल्वे व राष्ट्रीय महामार्गावर असल्यामुळे हे तीर्थक्षेत्र देशात नावारूपाला आले आहे. अध्यात्म आणि पर्यटनाची सांगड घालणारा आनंद सागर प्रकल्पामुळे येथील पर्यटनाला चालना मिळाली.

याशिवाय मेहकर आणि देऊळगाव राजा येथील बालाजी मंदिर भाविकांचे श्रद्धास्थान आहे. यात्रा महोत्सवात राज्यभरातील भाविक सहभागी होतात. सिंदखेड राजा हे छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोळ व माँ जिजाऊ यांचे जन्मस्थळ आहे. माँ साहेबांच्या जन्मदिनी देशभरातील शिवभक्त येथे येऊन माँ साहेबांपुढे नतमस्तक होतात. बुलढाणापासून जवळच अजिंठा लेणी आहे. येथे लेणी निरीक्षणासाठी देश-विदेशातील पर्यटक व अभ्यासक वर्षभर भेट देतात. संग्रामपूर तालुक्यात अंबाबरवा हे अभयारण्य आहे. जंगल सफारीची हौस असलेल्यांसाठी हे चांगले ठिकाण आहे. बोथा येथे ज्ञानगंगा अभयारण्य आहे. या जंगलात बिबट, अस्वल, नीलगाय, हरीण आदी वन्य प्राणी वास्तव्यास आहेत. जंगल भ्रमंतीचा आनंद पर्यटकांना मिळू शकतो. याशिवाय अनेक लहान-मोठी पर्यटनस्थळे आहेत. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने या सर्व पर्यटनस्थळे व तीर्थक्षेत्रांचा व्यवस्थित प्रचार व प्रसार केल्यास बुलढाणा जिल्ह्यातील पर्यटन उद्योगाला चालना मिळू शकते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पर्यटन उद्योग सुरू होऊन रोजगार निर्मिती होऊ शकते. पर्यटकांची संख्या वाढल्यास हॉटेल, टॅक्सी, गाईड व्यवसायाला चालना मिळेल. रोजगार निर्मितीतून अर्थव्यवस्थेला उभारी मिळू शकते. तेव्हा, शासनाने बुलढाणा जिल्ह्याच्या पर्यटन विकासासाठी कृती आराखडा तयार करावा. लहान-मोठे व मध्यम प्रकल्पांवर नौकानयन व इतर सुविधा उपलब्ध केल्यास शासनाच्या तिजोरीत मोठ्या प्रमाणात महसूल जमा होऊ शकतो. जिल्ह्यातील युवकांना रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध होतील. परिणामी हाताला काम मिळाल्याने त्यांची क्रयशक्ती वाढेल. तेव्हा, महाराष्ट्र शासनाने पर्यटन उद्योग सुरू करण्याच्या दृष्टीने तातडीने पावले उचलणे आवश्यक आहे. ▮

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

नागेश दाचेवार

# हा तर सैतानाने वेद वाचण्यासारखा प्रकार!

काँग्रेसच्या नेत्या प्रियांका वढेरा यांनी नुकताच एक सवाल उपस्थित केला आहे. त्या संसदेत उभे राहून उन्नाव, हाथरस आणि मणिपूरमधील अन्यायाचे काय, असा प्रश्न उपस्थित करतात. स्वतःला महिलांच्या मसिहा म्हणवून घेतात. ज्यांच्या पक्षाचा संपूर्ण इतिहासच महिलांच्या अब्रूची आणि सन्मानाची धूळधाण उडवण्यावर आधारित आहे, त्यांनी आज महिला सुरक्षेबद्दल बोलणे म्हणजे कावळ्याने शूचितेची भाषा करण्यासारखेच म्हणावे लागेल. ज्या पक्षाच्या कारकीर्दीत महिलांच्या सन्मानावर वारंवार गदा आली, ज्यांच्या राजकीय वारशावरच महिला अत्याचारांच्या घटनांचे डाग आहेत, त्या पक्षाच्या नेत्यांनी आज नैतिकतेचा आव आणत महिला सुरक्षेचे धडे देणे म्हणजे जणू 'सैतानाने वेद वाचण्यासारखा' प्रकार आहे.

### सत्तेसाठी सोयीचा इतिहास

प्रियांका वढेरा आज ज्या उन्नाव, हाथरस आणि मणिपूरच्या घटनांचा उल्लेख करीत आहेत, त्या नक्कीच निषेधार्ह आहेत आणि त्यावर कायद्याने कडक कारवाई झालीच पाहिजे. पण, त्याच वेळी प्रश्न पडतो की, काँग्रेसच्या ६०-७० वर्षांच्या सत्ताकाळात घडलेल्या शेकडो घटनांवर प्रियांका वढेरा आणि त्यांचे 'राजघराणे' गप्प का होते? दिल्लीत निर्भया प्रकरण घडले, त्याआधी युवक काँग्रेसच्या नेत्या नयना साहनी हत्येचं गाजलेलं तंदूर प्रकरण तेव्हा याच काँग्रेसच्या काळात दिल्लीतील महिला किती सुरक्षित होत्या? नलिनी श्रीकरणपासून ते मथुरा बलात्कार प्रकरणापर्यंतचा इतिहास काँग्रेसचा 'महिला सन्मान' किती दांभिक होता, हे सांगायला पुरेसा आहे. देशातील महिलांवर अत्याचार होत असताना सत्तेत असणाऱ्यांना तेव्हा 'मसिहा' आठवत नव्हता का? तेव्हा महिलांचा आवाज काँग्रेसच्या सत्तेच्या गल्लीत चिरडला जात नव्हता का? बरं उन्नाव, हाथरस, मणिपूरची आठवण यांना विसरू देत नाही. मात्र, त्याचवेळी या वढेरा बाईंना कलकत्याच्या एम. जी. कर रुग्णालयातील प्रशिक्षणार्थी ३१ वर्षीय डॉक्टर तरुणीवर बलात्कार व खून झाला, तेलंगणातील हैदराबादमध्ये २७ वर्षीय पशुवैद्यक तरुणीवर सामूहिक बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली, आरोपींनी टोल प्लाझाजवळ दुचाकीला पंक्चर झाल्याचे भासवून मदतीच्या बहाण्याने तिला पळवून नेले. नंतर जळित मृतदेह उड्डाणपुलाखाली सापडला. पण तेलंगणात सत्ता काँग्रेसची असल्यानं त्याची आठवण वढेरांना येत नाही.



### 'उबाठा' गट आणि महाराष्ट्रातील महिला सुरक्षा

आता वळूया महाराष्ट्राकडे. प्रियांका वढेरांना मणिपूर, उन्नाव, हाथरसमधील महिलांची काळजी वाटते, पण त्यांना महाविकास आघाडीच्या काळात, विशेषतः 'उबाठा' (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या सत्ताकाळात महाराष्ट्रात काय चालले होते, हे दिसत नाही का? त्यावेळी याच महाराष्ट्रात छत्रपती संभाजीनगर येथे एका दलित तरुणीला भररस्त्यात जिवंत जाळले गेले होते. मुंबईतील साकीनाका परिसरात पाशवी बलात्कार... अशा बलात्काराच्या घटना बऱ्याच झाल्यात. हिंगणघाट येथे शिक्षिकेवर पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रयत्न झाला, तेव्हा गृहखाते कोणाकडे होते आणि मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर कोण बसले होते? 'उबाठा' गटाच्या सत्ताकाळात महिला अत्याचाराच्या घटनांची मालिका सुरू असताना हेच तथाकथित पुरोगामी नेते गप्प का होते? शिवाय कंगना राणावत, नवनीत राणा, केतकी चितळे यांच्याबाबतीत तर सत्तेचा माज दाखवला गेला आणि स्वप्ना पाटकरांच्या बाबतीत यांच्या संजय राऊतांनी तर लायकीच दाखवली. तेव्हा यांना 'महिलांचा सन्मान' आठवत नव्हता. संजय राऊत दररोज सकाळी उठून ज्या पद्धतीने महिला नेत्यांबद्दल आणि विरोधकांबद्दल अर्वाच्च भाषा वापरतात, तो काय महिलांचा सन्मान आहे? ज्यांच्या पक्षातील लोक महिलांना धमकावतात, त्यांच्या मुखातून महिला सुरक्षेची भाषा म्हणजे शुद्ध ढोंग आहे. ज्यांनी सत्तेच्या लाचारीसाठी हिंदुत्वाशी तडजोड केली आणि वारंवार महिलांचा अपमान केला, त्यांना दुसऱ्यांवर बोट उचलण्याचा नैतिक अधिकार उरलेला नाही.

### महिला आरक्षण : एक ऐतिहासिक पाऊल

मोदी सरकारने आणलेले विधेयक महिला आरक्षणाचे नव्हतेच, असे धादांत खोटे वक्तव्य प्रियांका वढेरा करीत आहेत. महिला आरक्षण विधेयक संसदेत मंजूर करून महिलांना राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे धाडस कोणी केले? काँग्रेसने इतकी वर्षे सत्तेत राहूनही जे काम केले नाही, ते पंतप्रधान मोदींनी केले. प्रियांका वढेरांनी केलेल्या टीकेतून केवळ त्यांची हताशा दिसते. जेव्हा स्वतःचे अपयश लपवता येत नाही, तेव्हा विरोधकांवर चिखलफेक करणे ही काँग्रेसची जुनीच पद्धत आहे. प्रियांका वढेरांनी विचारले की, मणिपूरमध्ये निर्वस्त्र करण्यात आलेल्या महिलांना भाजपाने कधी विचारले का? वढेरांच्या या भूमिकेनंतर आता प्रश्न असा उपस्थित होतो की, काँग्रेसच्या काळात जेव्हा काश्मीरमध्ये काश्मिरी पंडितांच्या महिलांवर अत्याचार झाले, तेव्हा तुमच्या सरकारने त्यांना विचारले होते का? भंडाऱ्याच्या खैरलांजीमधील सुरेखा आणि त्यांची १७ वर्षीय मुलगी प्रियांका यांच्यावर बलात्कार करून रस्त्यावर निर्वस्त्र धिंड काढली होती, तेव्हा कोणाचं राज्य होतं; तेव्हा तुमची 'संवेदनशीलता' सुट्टीवर होती? तुम्ही आज मणिपूरवर बोलता. कारण तुम्हाला तिथे राजकीय पोळी भाजायची आहे. तुम्ही हाथरस आणि उन्नाववर बोलता. कारण तुम्हाला मतांचे राजकारण करायचे आहे. पण तुम्ही हे विसरताय की, देश आता जागरूक झाला आहे. जनतेला आता कळले आहे की, 'महिला सन्माना'चा वापर केवळ निवडणुकीत मते मिळविण्यासाठी केला जातोय. प्रियांका वढेरांनी आणि त्यांच्यासोबत उबाठा गटाच्या नेत्यांनी आधी स्वतःच्या घराचे छत तपासावे, जिथे अनेकदा महिलांवर अन्याय करणाऱ्यांची पाठराखण केली जाते. ज्यांचा स्वतःचा इतिहास महिलांचा अपमान करण्याचा आणि गुन्हेगारांना पाठीशी घालण्याचा राहिला आहे, त्यांनी मोदीजींवर आरोप करणे म्हणजे सूर्यावर थुंकण्यासारखे आहे. जनता हे सर्व पाहत आहे आणि येणाऱ्या काळात अशा ढोंगी राजकारण्यांना त्यांची जागा दाखवून देण्यास ती सज्ज आहे. ▮

९२७०३३३८८६

## छोटी छोटी खुशीया...!

आनंद कुठे आहे आणि कसा आहे याचे उत्तर तो आपल्या आत आहे आणि अतिशय सुंदर आहे. असे असले तरी प्रत्येकाची आनंदाची व्याख्या मात्र भिन्न भिन्न आहे. लहान मूल जसे लहान लहान गोष्टीत आनंदी असते तसे मोठे झाल्यावर जमले पाहिजे. मोठे होत असताना मात्र लहान लहान गोष्टीत नाही तर मोठ्या गोष्टीत तो शोधला जातो आणि मिळाला नाही तर मन निराश होतं. नुकत्याच एका कार्यक्रमात, जाहिरातीत 'छोटी छोटी खुशीयां' साजरी कशी आणि का करायची हे सांगितले. जीवन सुंदर आहे, पण त्यात चढ-उतार हे येणारच हे निश्चित. त्यात आनंदाचे प्रत्येक क्षण जपले पाहिजे. त्यात त्याला कुटुंब, मित्र-मैत्रिणी, नातेवाईकांनी सहभागी करता आले पाहिजे. असे हे आनंदाचे क्षण कायम स्मरणात राहतात. जे पुढील आयुष्यात सकारात्मक दृष्टिकोन देऊन जातात. आज आनंद आहे, उद्या दुःख आहे हे तर येणारच; पण त्या दुःखाच्या क्षणी हे आनंदाचे क्षण सावरून घेतात आणि त्यामुळे आपणही लगेच सावरतो. खरे तर माणसाचा स्वभाव दुःख कुरवाळण्याचा आहे आणि आनंद विसरण्याचा आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षणाचा उत्सव करता यायला हवा तरच जीवन खऱ्या अर्थाने समृद्ध संपन्न होईल. प्रयत्न करायला काही हरकत नाही. वेळ लागला तरी जमेल हे निश्चित.

**संगीता वाईकर**/ नागपूर, ९९२२५०४७९४

●● ●●

### नव्या स्वरूपातील तरुण भारत

गेल्या काही दिवसांपासून तरुण भारत वाचताना एक वेगळेपण जाणवायला लागले. म्हणून जरा जुने अंक आणि नवे अंक बारकाईने बघितले आणि मग वृत्तपत्राच्या मांडणीत झालेला बदल लक्षात आला. मांडणी अधिक आटोपशीर, सुटसुटीत आणि आकर्षक झाली असल्याचे लक्षात आले. शीर्षकाचा फॉन्ट बदलला आहे. त्यामुळे ठळकपणे बातम्या सहज लक्षात येतात. या बदलांमुळे तरुण भारत अधिक वाचनीय झाला आहे. यासाठी तरुण भारतचे हार्दिक अभिनंदन.

**प्रसाद दत्तात्रेय पोफळी** /९८२२५६९६४८

## वाचक पत्रे

### निद्रिस्त पालकांनो जागे व्हा...!

एप्रिल महिन्याचा शेवट होत आला आहे. विदर्भ उकाड्याने हैराण आहे. नागरिकांच्या आरोग्यावर उष्णतेचा विपरीत परिणाम होत आहे. तरीही शाळा अजूनही सुरू आहेत. पालकांचे आपल्या मुलांकडे लक्ष नसते. मुले शाळेतून घरी येताना डोक्याला काहीही न बांधता उन्हातान्हात येतात. परिणामी ते आजारी पडतात. पालक मात्र आता शाळा बंद करावी यासाठी काहीही भूमिका घेताना दिसत नाही. परिणाम लहान मुलांना भोगावा लागत आहे. पालकांनो.. वेळीच जागे व्हा. शाळा संचालक आपली फी पूर्ण करण्यासाठीच इतक्या उन्हात शाळा सुरू ठेवत आहेत, हे लक्षात येत नाही का तुमच्या? मुले आजारी पडत असतानादेखील तुम्ही त्याकडे कानाडोळा का करताहात? एका पालकाने मागणी केली तर ती पूर्ण होत नाही, पण अख्खा पालक वर्ग पेटून उठला तर शाळेला मागणी करावेच लागते. जरा डोळे उघडा आणि आपल्या मुलांना या प्रचंड उन्हापासून वाचवा.

**अपर्णा अग्निहोत्री** / नागपूर

●● ●●

### प्रेरणादायी स्तुत्य भगवा उपक्रम

पुणे शहरात सकाळी आपण घरातून बाहेर पडल्यावर कोणत्याही मोठ्या सिग्नलला जरा थांबलो असता एक सुमधुर, स्फूर्तिदायी गाण्याची धून सहजच कानावर पडते. ती ऐकून आपणही आपसूकच ती धून मनाशी गुणगुणू लागतो. ज्या पराक्रमाने छत्रपती शिवाजी राजेंनी वाघनखांनी अफजल खानाचा कोथळा बाहेर काढून त्या हिरव्या कपटी देशद्रोह्याचा वध केला त्या शौर्याचे गुणगान गाणारा (अफजल खान वधाचा पोवाडा) पुणे महापालिकेच्या वतीने सिग्नलला सीसीटीव्ही, विद्युत खांबांवरील ध्वनिवर्धकांवरून सगळ्यांना ऐकवला जातोय. क्षणभरात सारा रोमांचकारी इतिहास आपल्या डोळ्यांसमोर उभा राहतो व एक प्रेरणेची, शौर्याची, स्फूर्तिदायी वीररसाची भगवी लकेर अंगातून सळसळून जाते. कळत-नकळत उराशी शिवरायांच्या त्या प्रचंड तेजोमय शौर्याचा अभिमान जागृत होतो. खरोखरीच सध्या जो हा एक प्रेरणादायी स्तुत्य भगवा उपक्रम राबविला जातोय तो कौतुकास पात्र आहे.

**आनंद बेंद्रे**/ पुणे

●● ●●

### सोन्याचे अंडे देणारी कोंबडी

नवीन रस्ते करणे व काही महिन्यातच त्या रस्त्याला परत खड्डे पडणे; लागलीच लाखांची टेंडर काढणे ही लाखाची गोष्ट सर्वसामान्य जनतेस काही नवीन नाही. तंत्रज्ञान एवढे विकसित झाले, मग चांगले रस्ते विकसित करायचे तंत्रज्ञान खरंच अवघड आहे का? महामार्ग असो, शहरी रस्ते असो, खेड्यापाड्यातील रस्ते असोत की गल्लीबोळ. कुठेही प्रवास करताना खड्डे कायमच आपल्या सोबतीत असतातच. पावसाळ्यात तर खड्ड्यांचे प्रताप प्रचंड असतात. सर्वसामान्यांसाठी खड्डे म्हणजे मृत्यूचा सापळा आहे. शारीरिक व्याधी जडताहेत. प्रवासाचा वेळ प्रचंड वाढतो. रस्ते तयार करणे व त्याची दुरुस्ती करणे म्हणजे संबंधितांसाठी सोन्याचे अंडे देणारी कोंबडीच आहे. ▮

**लोकेश बापट**/ पुणे

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट न ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# आदित्य इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांची चार्जिंग स्टेशनला भेट

**तभा. वृत्तसेवा**

**बीड |** शहरातील आदित्य एज्युकेशन ग्रुप संचलित आदित्य इंजिनिअरिंग कॉलेजच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. इमामपूर रोडवरील ई-व्हीकल चार्जिंग स्टेशनला भेट देऊन विद्यार्थ्यांनी बॅटरी चार्जिंग तंत्रज्ञान आणि ई-बसच्या कार्यप्रणालीचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. या भेटीमुळे विद्यार्थ्यांच्या पुस्तकी ज्ञानाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड मिळाली. विद्यार्थ्यांनी भविष्यातील 'इलेक्ट्रिक क्रांती चा अनुभव घेतला. ई-बसचे तंत्रज्ञान,बॅटरी चार्जिंग आणि एसी सिस्टीमची प्रत्यक्ष माहिती घेतली.

ही औद्योगिक भेट आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा आणि संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली

**पुस्तकी ज्ञानाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड, विद्यार्थ्यांनी अनुभवली भविष्यातील 'इलेक्ट्रिक क्रांती', ई-बसचे तंत्रज्ञान; बॅटरी चार्जिंग आणि एसी सिस्टीमचा घेतला प्रत्यक्ष अनुभव**

यशस्वी संपन्न झाली. द्वितीय, तृतीय आणि अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी या भेटीत सक्रिय सहभाग नोंदवला. यावेळी चार्जिंग स्टेशनचे डेपो मॅनेजर बाळू जगताप यांनी विद्यार्थ्यांना इलेक्ट्रिक वाहनांची कार्यप्रणाली, चार्जिंग प्रक्रिया आणि बॅटरी सिस्टीमची सविस्तर माहिती दिली. विशेषतः ई-बसमध्ये वापरले जाणारे एसी कूलिंग तंत्रज्ञान आणि ऊर्जा बचतीची पद्धत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उपकरणांद्वारे समजावून सांगण्यात आली. ही भेट यशस्वी करण्यासाठी आदित्य शिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. निलेश बहादुरे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

# विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यानमाला ; पुष्प- ५ वे

## अस्वस्थ मनस्थितीतून सहजरीत्या केलेली सेवा म्हणजे समाजसेवा ; प्राचार्य सोमनाथ रोडे

**तभा. वृत्तसेवा**

**केज प्रतिनिधी |** "वेदना ही जीवन की साधना होती है." या उक्तीप्रमाणे समाजसेवक बाबा आमटे आणि तुळशीराम यांची भेट ही कुष्ठरोगी सेवेच्या इतिहासातील एक अत्यंत भावनिक आणि निर्णायक क्षण मानला जातो. या भेटीनंतरच बाबांनी आपले आयुष्य कुष्ठरोग्यांच्या सेवेसाठी वाहून घेण्याचा निर्णय घेतला. तो एका ओढ्याकाठी मरणासन्न अवस्थेत पडला होता. कुष्ठरोगामुळे त्याच्या शरीराची अत्यंत दयनीय अवस्था झाली होती. या भयावह अवस्थेने त्यांना आतून हलवून सोडले. समाजातील कुष्ठरोग्यांची उपेक्षा पाहून त्यांना प्रचंड वेदना झाल्या आणि कुष्ठरोग्यांच्या सेवेसाठी आपले आयुष्य




समर्पित करण्याचा निश्चय केला. बेचैन अवस्थेतून राहवत नाही म्हणून सहजरीत्या केलेली सेवा म्हणजे समाजसेवा होय. सेवा किंवा सत्कर्म करताना स्वार्थ न ठेवता सर्वांभूती भगवद्भाव पाहणे, म्हणजेच जातीच्या पलीकडे जाऊन कर्म करणे. असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगर येथील प्राचार्य सोमनाथ रोडे यांनी केले.

केज येथील स्वामी विवेकानंद विद्या मंदिर या शाळेमध्ये दि. २५ एप्रिल रोजी जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित स्व. विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यानमालेचे पाचवे पुष्प गुंफण्यासाठी प्रमुख वक्ते म्हणून प्राचार्य. सोमनाथ रोडे विभागीय अध्यक्ष, मराठवाडा जनता विकास परिषद, छत्रपती संभाजीनगर हे उपस्थित होते. तर अध्यक्ष म्हणून श्री. दगडू दादा लोमटे कार्यकारिणी सदस्य, मराठवाडा साहित्य परिषद छत्रपती संभाजीनगर. हे उपस्थित होते.

# पट्टीवडगावात गॅस सिलेंडरचा स्फोट दहाव्याच्या स्वयंपाकावेळी भीषण आग, दोन घरे जळून खाक...!

**तभा. वृत्तसेवा**

**अंबाजोगाई |** अंबाजोगाई तालुक्यातील पट्टीवडगाव येथे आज सकाळी साडेनऊच्या सुमारास गॅस सिलेंडरचा भीषण स्फोट होऊन मोठी आग लागल्याची धक्कादायक घटना घडली. पत्नीच्या निधनानंतर दहाव्याच्या विधीसाठी स्वयंपाक सुरू असतानाच हा स्फोट झाला. या आगीत दोन घरे आणि घरातील संपूर्ण संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले असून गावात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पट्टीवडगाव येथील बालासाहेब जाधव यांच्या पत्नी पार्वतीबाई जाधव यांचे १२ एप्रिल २०२६ रोजी कॅन्सरने निधन झाले होते. त्यांच्या दहाव्याचा कार्यक्रम आज आयोजित करण्यात आला होता. सकाळपासून स्वयंपाकाची तयारी सुरू असताना सुमारे ९.३० वाजता स्वयंपाकाच्या भट्ट्याने अचानक पेट घेतला. काही क्षणांतच भट्ट्याला जोडलेल्या गॅस सिलेंडरचा मोठा स्फोट झाला. स्फोट इतका तीव्र होता की, माळवदाच्या घराला तात्काळ आगीने वेढा घातला. घराचे लाकडी बांधकाम असल्याने आगीने काही मिनिटांतच भीषण रूप धारण केले. ही आग शेजारील दुसऱ्या घरातही पसरली. परिणामी दोन्ही घरांतील धान्य, कपडे, भांडी तसेच इतर संसारोपयोगी वस्तू पूर्णपणे जळून खाक झाल्या.

सकाळच्या वेळी झालेल्या या स्फोटाच्या मोठ्या आवाजाने संपूर्ण गाव हादरले. ग्रामस्थांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत आग विझवण्याचा प्रयत्न केला. मोठ्या प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, पत्नीच्या निधनाचे दुःख असतानाच राहते घर आणि सर्व संसार जळून खाक झाल्याने बालासाहेब जाधव यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेमुळे कुटुंब आर्थिक आणि मानसिकदृष्ट्या खचले आहे. दरम्यान, महसूल प्रशासनाने तातडीने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करावा व पीडित कुटुंबाला आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून जोर धरत आहे.

# केंद्रीय मुख्याध्यापक सूर्यकांत काळे यांचा सेवागौरव सोहळा

**तभा. वृत्तसेवा**

| खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते सन्मान होणार -प्रकाश बोधले महाराज यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती



केज : प्राथमिक शिक्षण चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते तथा साळेगाव येथील जिल्हा परिषद प्रशालेतील केंद्रीय मुख्याध्यापक सूर्यकांत तुकाराम काळे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार सोहळयाचे आयोजन येत्या शनिवारी (दि.२५) करण्यात आले आहे. बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांच्या हस्ते हा गौरव सोहळा होणार आहे.

गेल्या ३५ वर्षापासून सुर्यकांत काळे हे जिल्हा परिषदतंर्गत कार्यरत आहेत. त्यांच्या सेवापूतीनिमित्त येत्या शनिवारी (दि.२५) सकाळी ११ वाजता निसर्ग मंगल कार्यालय येथे हा कार्यक्रम होणार आहे. केजचे गटशिक्षणधिकारी सुनील केंद्रे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. हभप प्रकाश बोधले महाराज, गणेश जोगदंड महाराज यांचे शुभाशीर्वाद या सोहळ्यास लाभणार आहेत. या कार्यक्रमास आ.कैलास पाटील, माजी मा.राजेंद्र राऊत, अंबासाखरचे चेअरमन रमेशराव आडसकर, माजी आ.संगीता ठोंबरे, माजी आ.पृथ्वीराज साठे, आरोग्य संचालक डॉ.अशोक थोरात, सोलापूर जि.प.अध्यक्ष दीपक वैद्य, सभापती अंकुशराव इंगळे, माजी शिक्षण सभापती राजेसाहेब देशमुख, माजी पंस सभापती राजेसाहेब देशमुख, ज्ञानेश्वर चवरे, संजय पाटील, अनुराधा नखाते, सीता बनसोड, हारुण इनामदार, सादिक इनामदार, नबाब इमाम, डॉ.देवेंद्र डोके भिमराव साठे, बालासाहेब बोराडे, बालासाहेब जाधव, बाळकृष्ण भवर, भगवान केदार, गुणवंत पवार, सरपंच कैलास पाटील, भालचंद्र गिते, सविता सरवदे, नारायण लांडगे, 'छावा'चे जिल्हाध्यक्ष शिवाजी ठोंबरे आदीची प्रमुख उपस्थिती राहणार आहेत. यावेळी सूर्यकांत व सुरेखा काळे यांचा गौरव करण्यात येणार आहे.

# अलनिनो' मुळे २०२७ मध्ये संभावित असलेल्या दुष्काळाची चाहूल लागताच आ.क्षीरसागर ॲलर्ट मोडवर

## बीड शहर आणि परिसरातील पाणीपातळीच्या वाढीसाठी प्रयत्न; काम सुरु असलेल्या पूल कम बंधाऱ्याच्या माध्यमातून पाणी अडविण्यासाठी नियोजन

**तभा. वृत्तसेवा**

**बीड दि.२५ (प्रतिनिधी)** | जागतिक हवामान तज्ञांनी सन २०२७ मध्ये 'अलनिनो' परिस्थिती निर्माण होऊन भीषण दुष्काळ पडण्याचा अंदाज वर्तविला आहे. संभाव्य दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आ.संदीप क्षीरसागर ॲलर्ट मोडवर आहेत. या अनुषंगाने बीड शहर आणि परिसरातील गावांमध्ये पाणीपातळी वाढविण्यासाठी बीड शहरातील बिंदुसरा नदीवर, काम सुरू असलेल्या पूल कम बंधाऱ्याच्या माध्यमातून पाणी अडविण्यासाठी नियोजन सुरू आहे. याबाबत सोमवारी (दि.२७) रोजी आ.क्षीरसागर यांनी बैठक आयोजित केली आहे.

सन-२०२७ मध्ये जागतिक हवामान तज्ञांनी 'सुपर अलनिनो' निर्माण होऊन भारतावर गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण होण्याचा अतिसंभाव्य धोका सांगितला आहे. त्या पार्श्वभूमीवर आ.संदीप क्षीरसागरांनी दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी नियोजन करण्यास सुरुवात केली आहे.बीड शहर, हद्दवाढ भाग आणि शहरालगतची गावे यामध्ये पाणी पातळी वाढविण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यावर भर दिला असून त्यासाठी आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम नियोजन करत आहेत.



### बेल्ट टाकून याच पावसाळ्यात पाणी अडविण्याचे नियोजन

बीड शहरात पूल कम बंधाऱ्याचे काम सध्या सुरू आहे. हे काम प्रगतीपथावर असून सदरील काम पूर्ण होण्यासाठी आणखी बराच वेळ लागण्याची शक्यता आहे.परंतु पुढच्या वर्षी अतिसंभाव्य असलेल्या दुष्काळातून निर्माण होणारी पाणीटंचाई टाळण्यासाठी याच पावसाळ्यात बंधारा कामाच्या ठिकाणी बेल्ट टाकून याच पावसाळ्यात किमान १ ते १.५० कि.मी. पर्यंत पाणी अडविण्यासाठी योजना सुरू आहे.

# शेख मुदस्सीर यांची 'सकल मुस्लिम युवक संघाच्या' प्रदेश संघटक पदी निवड

**तभा. वृत्तसेवा**

**परळी |** प्रतिनिधी | परळी येथील सामाजिक, राजकीय तसेच पत्रका सक्रिय असलेले शे नसीर यांची सकल युवक महाराष्ट्र संघट संघटक पदी निवड आली आहे.



ही निवड दिनांक २३ एप्रिल रोजी करण्यात असून आहे.

शेख मुदस्सीर हे मागील अनेक वर्षांपासून समाजकारण आणि पत्रकारिता क्षेत्रात काम करत आहेत. सामाजिक प्रश्नांची चांगली जाण, लोकांशी संवाद साधण्याची क्षमता आणि युवकांना एकत्र कौशल्य यामुळे त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. विविध सामाजिक मुद्द्यांवर त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला असून, गरजूंना मदत करणे, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आणि समाजात जागरूकता निर्माण करणे यामध्ये त्यांचा मोठा सहभाग राहिला आहे.

त्यांच्या या सातत्यपूर्ण कामाची तसेच सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र संघटनेसोबत सुरुवातीपासून असलेल्या दखल घेत संघटनेचे मा. अझरुद्दीन यांनी त्यांची प्रदेश म्हणून निवड केली पदाच्या माध्यमातून ल युवकांना संघटित सामाजिक आणि संवैधानिक न्याय हक्कांसाठी लढा अधिक बळकट करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

निवडीबद्दल बोलताना शेख मुदस्सीर यांनी सांगितले की, 'ही जबाबदारी माझ्यासाठी सन्मानाची असून, सामाजिक अस्तित्व आणि संवैधानिक अधिकारांसाठी मी अधिक जोमाने काम करणार आहे. संघटनेच्या माध्यमातून राज्यातील युवकांना एकत्र आणून सकारात्मक बदल घडवण्याचा माझा प्रयत्न राहील.'

दरम्यान, त्यांच्या या निवडीबद्दल विविध सामाजिक, राजकीय आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# गेवराईत दहा दिवसीय डान्स & ॲक्टिंग शिबिराचे भव्य आयोजन...!

**तभा. वृत्तसेवा**

**बीड |** बालरंगभूमी परिषद शाखा, बीड, नाट्यशास्त्र विभाग, सौ. के.एस.के महाविद्यालय बीड, आणि आर्ट ऑफ फन अकॅडमी गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने गेवराई मधे दहा दिवसीय डान्स आणि अक्टिंग शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.

अधिक माहिती अशी की, नुकत्याच सर्वत्र शाळेला उन्हाळ्याच्या सुट्या लागलेल्या आहेत. परंतु सुट्यांमध्ये मूल मैदानांवर न खेळता मोबाईल च्या स्क्रीन मधेच गुंतलेले पाहण्यास मिळतात. म्हणूनच, मुलांचा स्क्रीन टाइम कमी करून, त्यांना कलेचे संस्कार देण्यासाठी ,त्यांच्या मानसिक तथा बौद्धिक आरोग्यासाठी बालरंगभूमी परिषद शाखा बीड,नाट्यशास्त्र विभाग, सौ. के.एस.के महाविद्यालय बीड, आणि आर्ट ऑफ फन अकॅडमी गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने गेवराई मधे दहा दिवसीय डान्स आणि अक्टिंग शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.

ज्यामध्ये सिने सृष्टीतील दिग्गज अभिनेता सोनी मराठी फेम जय जय शनिदेव प्रमुख अभिनेता / दिग्दर्शक श्री.संकेत खेडकर, झी मराठी कलर्स मराठी, फेम सिने कलावंत/दिग्दर्शक श्री.देवीप्रसाद सोहोनी , सुप्रसिद्ध नाट्य दिग्दर्शक श्री.लक्ष्मीकांत दोडके, नृत्य विशारद श्री.राधाकृष्ण वाघ, आणि लेखक / दिग्दर्शक डॉ.अस्लम शेख सर या दिग्गज कलावंतांचे मार्गदर्शन लाभणार आहे. सदर शिबिर हे दिनांक २७ एप्रिल ते ०६ मे २०२६,दरम्यान महात्मा फुले शॉपिंग सेंटर (तापडिया सिटी सेंटर) बाजारतळ, गेवराई या ठिकाणी होणार आहे.

तसेच शिबिरात सहभागी होणाऱ्या बालकलावंताना आर्ट ऑफ फन अकॅडमी व बालरंगभूमी परिषदेच्या विविध प्रोजेक्ट मध्ये काम करण्याची सुवर्ण संधी प्राप्त होणार आहे. म्हणूनच गेवराई तथा परिसरातील जास्तीत जास्त मुलांनी या शिबिराचा लाभ घेण्यासाठी खालील नंबर वर संपर्क करावा असे आवाहन बालरंगभूमी परिषद उपाध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर मॅडम, नाट्यशास्त्र विभाग प्रमुख, डॉ.संजय पाटील देवळाणकर सर,शाहीर विलास बापू सोनवणे सर, दीपक गिरी, शिवकुमार सोनवणे, रोहित पुराणिक, विवेक शर्मा यांनी केले आहे.

अधिक माहिती साठी संपर्क :-

रोहित पुराणिकः- ९३२५२१२१९९, शिवकुमार सोनवणे ९६८९२६३२२०, दिपक गिरी ८१७७९२४७५६ विवेक शर्मा ९८३६७६८६२०.

# भिडेवाडा चित्ररथास डॉ. संजय तांदळे यांचे अभिवादन

**तभा. वृत्तसेवा**

**बीड (प्रतिनिधी) |** क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचावेत यासाठी समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्याचे मंत्री ना. छगनराव भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली आणि समता परिषदेचे कार्याध्यक्ष माजी खा. समीर भाऊ भुजबळ, आ. पंकजभाऊ भुजबळ यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आलेल्या क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले



यांनी पुण्यातील भिडे वाडा येथे सुरू केलेल्या पहिल्या मुलीच्या शाळेच्या भिडेवाडा चित्ररथाचे शिक्षणातून समता हा संदेश देत बीड शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे दि. २४ एप्रिल २०२६ शुक्रवार रोजी सकाळी १० वाजता उत्साह

# बीड जिल्ह्यात बोगस डॉक्टरांविरोधात कारवाईसाठी माननीय जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली

**तभा. वृत्तसेवा**

**बीड |** बीड जिल्ह्यात बोगस डॉक्टरांच्या वाढत्या प्रमाणावर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी आज माननीय जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक १६.३० ते १७.३० वा. दरम्यान संपन्न झाली. सदर बैठकीस अन्न व औषध प्रशासन विभाग बीड येथील मा. सहाय्यक आयुक्त, महादेव निमसे, आय.एम.ए.बीड. अध्यक्ष डॉ. अनंत मुळे, ग्राहक पंचायत अध्यक्ष बीड अशासकीय सदस्य प्राध्यापक आर.टी. गर्जे, शेख सिराज शेख आयुब अशासकीय सदस्य, पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय) सदस्य सचिव उमाशंकर कस्तुरे तसेच मा. जिल्हा शल्यचिकित्सक, बीड, मा. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद बीड, जिल्हा माहिती अधिकारी बीड, स्वामी रामानंदतिर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई, येथील प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान जिल्ह्यात कार्यरत असलेल्या बोगस डॉक्टरांविरोधात कठोर आणि समन्वयित कारवाई करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. माननीय जिल्हाधिकारी यांनी आरोग्य व पोलीस विभागाने संयुक्त पथके तयार करून तालुका स्तरावर विशेष तपासणी मोहीम राबवावी, तसेच बेकायदेशीर वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करण्याचे निर्देश दिले.

यावेळी जिल्ह्यातील खासगी दवाखाने, क्लिनिक व औषध विक्रेत्यांची कागदपत्रे तपासण्यावर भर देण्यात आला. अधिकृत परवाना नसताना वैद्यकीय सेवा देणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही प्रशासनाकडून देण्यात आला. नागरिकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड होऊ नये, यासाठी जनजागृती मोहीम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. नागरिकांनीही संशयास्पद वैद्यकीय व्यवसायाची माहिती प्रशासनाला द्यावी, असे आवाहन करण्यात आले.

बीड जिल्ह्यात आरोग्य सेवा अधिक सुरक्षित व पारदर्शक करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# स्व.अजितदादा पवार यांच्या नावाने वैद्यकीय सहाय्यता कक्ष स्थापनेचा निर्णय घेणारी परळी वैजनाथ नगर परिषद ठरणार पहिली!

## अभिनव सेवाउपक्रम ; परळी नगर परिषदेच्या वतीने 'स्व. अजितदादा पवार वैद्यकीय सहाय्यता कक्ष'होणार स्थापन लाभार्थ्यांचा शासनस्तरावर पाठपुरावा करण्यासाठी एकाच छताखाली सर्व सेवा

**तभा. वृत्तसेवा**

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)** | परळीत नगर परिषद क्षेत्रातील नागरिकांना शासकीय वैद्यकीय योजनांचा लाभ सुलभ, वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने मिळावा या उद्देशाने नगर परिषद कार्यालयात "स्व. अजितदादा पवार वैद्यकीय सहाय्यता कक्ष" स्थापन करण्यास न.प.च्या स्थायी समितीने एकमताने मंजुरी दिली आहे.नगर परिषद स्थायी समितीच्या बैठकीत यासंदर्भातील ठराव मंजूर करण्यात आला असल्याची माहिती नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी दिली आहे. दरम्यान, अशा प्रकारचा स्व. अजितदादा पवार वैद्यकीय सहाय्यता कक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेणारी परळी नगर परिषद महाराष्ट्रात पहिली नगर परिषद ठरणार आहे.

नागरिकांना विविध आरोग्य योजनांची माहिती, अर्ज प्रक्रिया आणि पाठपुरावा यासाठी एकाच ठिकाणी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली "स्व. अजितदादा पवार वैद्यकीय सहाय्यता कक्ष" स्थापन करण्यात येणार आहे.या कक्षाच्या स्थापनेसाठी लागणारा खर्च नगर परिषद निधीतून किंवा शासन अनुदानातून मंजूर करण्यात येणार असून, आवश्यकतेनुसार आरोग्य विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय व इतर यंत्रणांशी समन्वय साधून नागरिकांना अधिकाधिक सुलभ वैद्यकीय सहाय्यता देण्याचे उदिष्ट ठेवण्यात आले आहे. स्थायी समितीच्या



बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून या बैठकीला नगराध्यक्ष सौ पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, स्थायी समिती सदस्य वैजनाथ सोळंके, प्रा पवन मुंडे, सौ.अंजलीताई माळी,सौ जयश्रीताई गीते, योगेश मेनूकुदळे यांच्यासह नगरपरिषदेचे उपमुख्य अधिकारी संतोष रोडे, सर्व अधिकारी, विभाग प्रमुख आदी उपस्थित होते.

एकाच छताखाली उपलब्ध होणार सर्व सेवा...

"स्व. अजितदादा पवार वैद्यकीय सहाय्यता कक्षामार्फत महाराष्ट्र शासनाच्या विविध वैद्यकीय सहाय्यता योजना, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना तसेच आयुष्मान भारत योजनेबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच अर्ज स्वीकृती, कागदपत्रांची पूर्तता, ऑनलाइन नोंदणी, संबंधित कार्यालयांशी समन्वय आणि लाभार्थ्यांचा पाठपुरावा करण्यात येणार आहे. या कक्षासाठी स्वतंत्र जागा, फर्निचर, संगणक, इंटरनेट, प्रिंटर आदी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. याशिवाय किमान एक प्रशिक्षित लिपिक/डेटा एंट्री ऑपरेटर आणि एक समन्वयक नियुक्त केला जाणार आहे.

नागरिकांना योजनांची माहिती देण्यासाठी माहितीपत्रके, हेल्पलाईन क्रमांक व मार्गदर्शक फलक लावण्यात येणार आहेत. तसेच प्राप्त अर्जांची नोंद ठेवून त्यांचा वेळेत पाठपुरावा करणे बंधनकारक राहणार आहे. कक्षाच्या कामकाजाचा मासिक अहवाल तयार करून मुख्याधिकारी आणि स्थायी समितीसमोर सादर केला जाणार आहे. नगर परिषद स्थायी समितीने हा महत्त्वाचा निर्णय घेत नागरिकांना आरोग्य सेवांचा लाभ अधिक सुलभ करण्याचा प्रयत्न केला आहे. या कक्षामुळे गरजू नागरिकांना वेळेत वैद्यकीय मदत मिळण्यास मोठी मदत होणार आहे. लवकरच नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रातील महाराष्ट्रातील पहिला सुसज्ज असा "स्व. अजितदादा पवार वैद्यकीय सहाय्यता कक्ष कार्यान्वित करण्यात येईल अशी माहिती नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी सांगितले.

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# दुधाळवाडी शिवारात मोटार व केबल चोरी

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२५ एप्रिल -**
येरमाळा पोलीस ठाण्याच्या हद्दीत दुधाळवाडी शिवारात शेतातील विहीर व बोअरमधील मोटार व केबल वायर चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी हनुमंत सुर्यभान जाधवर (वय ६५, रा. रत्नापुर ता. कळंब, जि. धाराशिव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांच्या शेतातील लक्ष्मी कंपनीची ५ एचपी पाणबुडी मोटार व सुमारे ९० फुट केबल वायर, तसेच दादाराव काशीनाथ बांगर यांच्या शेतातील विहीर व बोअरमधील मोटार व केबल असा एकूण २८,५०० रुपयांचा मुद्देमाल अज्ञात व्यक्तीने चोरून नेला. ही चोरीची घटना दि.१९ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० ते दि.२४ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ या कालावधीत दुधाळवाडी शिवारातील शेतगट क्रमांक ३३०/३/ब/२ येथे घडली.

या प्रकरणी हनुमंत जाधवर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करत आहेत.



## संक्षिप्त वृत्त...




### लोहारा बसस्थानकात प्रवाशांसाठी वेळापत्रक फलकाची सुविधा

**लोहारा, दि.२५ एप्रिल -**
शहरातील बसस्थानकात प्रवाशांच्या सोयीसाठी हाजी शब्बीर अहमद अन्सारी बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या व मित्रपरिवाराच्या वतीने चार पंखे, वाहन वेळापत्रक फलक तसेच दररोज १००० लिटर पिण्याच्या पाण्याची टाकी बसविण्यात आली. या सुविधांचे उद्घाटन नायब तहसीलदार नाना मोरे व नागण्णा वकील यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष महेबूब फकीर, नगरसेवक आयुब हबीब शेख, काका भंडारे, संतोष घाटे, तुकाराम घोडके यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमासाठी वर्षा चौधरी, परवेज तांबोळी, जहागीर मोमीन, चेतन बेंडगे तसेच महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या लोहारा शाखेचे अधिकारी यांनी देणगीद्वारे सहकार्य केले. बसस्थानकात मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने प्रवाशांना त्रास सहन करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर संस्थेने पाणी व पंख्यांची व्यवस्था करून तसेच बस वेळापत्रक फलक लावून प्रवाशांची गैरसोय कमी केली आहे. या उपक्रमाचे प्रवाशांकडून स्वागत होत आहे.

### सुतीर्थ व्यास याचे मंथन परीक्षेत यश

**धाराशिव, दि.२५ एप्रिल -**
येथील लोकसेवा समिती, धाराशिव संचलित आर्य चाणक्य प्राथमिक विद्यालयातील पहिलीच्या वर्गातील



सुतीर्थ पद्मनाभ व्यास या विद्यार्थ्याने राज्यस्तरीय मंथन सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा २०२६ मध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. त्याने एकूण १५० पैकी ११८ गुण प्राप्त केले आहेत. सुतीर्थ व्यास याने मंथन परीक्षेत राज्यात १७ वा. क्रमांक, जिल्ह्यात १२ वा. क्रमांक, तालुक्यात ५ वा. क्रमांक प्राप्त केला असून केंद्रात प्रथम येण्याचा बहुमान त्याने मिळविला आहे. सुतीर्थ व्यास याने प्राप्त केलेल्या यशाबद्दल लोकसेवा समिती धाराशिव आणि आर्य चाणक्य प्राथमिक विद्यालयाच्या वतीने त्याचा वाचनीय पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.



### महाआरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद; ५२ जणांचे रक्तदान

**भूम, दि.२५ एप्रिल -**
अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यानिमित्त भूम पंचायत समिती सदस्य बाळासाहेब खरवडे यांच्या संकल्पनेतून आयोजित महाआरोग्य शिबिर व सर्व रोग निदान शिबीर शुक्रवारी उत्साहात संपन्न झाले. या शिबिरास ग्रामस्थांचा प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे उद्घाटन गट विकास अधिकारी एल.आर. वाझे, विस्तार अधिकारी बोयणे, शिवाजी जालन, रवींद्र पवार तसेच ग्रामपंचायत अधिकारी दीपक गोरे यांच्या हस्ते झाले. शिबिरात एकूण ३५० रुग्णांची मोफत तपासणी करून आवश्यक औषधोपचार करण्यात आले. तसेच ५२ तरुणांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल शिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली शिबीर यशस्वीरीत्या पार पडले. यावेळी विशाल डोके, बाजीराव जालन, हनुमंत आहेर, भास्कर थोरात, राजेसाहेब थोरात आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल डोके यांनी केले, तर आभार बाळासाहेब खरवडे यांनी मानले.

### पत्नीशी फोनवर बोलण्याच्या कारणावरून मारहाण

**धाराशिव, दि.२५ एप्रिल -**
धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत आळणी येथे पत्नीशी फोनवर बोलण्याच्या कारणावरून झालेल्या



वादातून आरोपी धनंजय अनंत कोरे (रा. आळणी) याने सचिन शिवाजी निंबाळकर (वय ४५) यांना शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी व काठीने मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना २२ एप्रिल रोजी रात्री घडली. दरम्यान, भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या फिर्यादीच्या मुलालाही आरोपीने काठीने मारहाण करून जखमी केले तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी सचिन निंबाळकर यांनी २४ एप्रिल रोजी दिलेल्या फिर्यादीवरून धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

# जिल्ह्यात ५७४ रुग्णांना सुमारे ४.८४ कोटींची मदत



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ एप्रिल -**
शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे. धाराशिव जिल्ह्यात आर्थिक वर्षात ५७४ रुग्णांना सुमारे ४ कोटी ८४ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले.

त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरित्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून राज्यातील शेकडो गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून उपचारासाठी भक्कम आधार मिळत आहे.

सुधारित कार्यपद्धती, तातडीने निर्णय आणि समाजाच्या सहभागामुळे मदतीचा लाभ अधिक वेगाने गरजूंपर्यंत पोहोचत आहे.अधिक माहितीसाठी व सहाय्यासाठी रूग्णांनी १८०० १२३ २२११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

### २० गंभीर आजारासाठी मदत...

कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस,कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य दिले जाते.

### आर्थिक वर्षातील मदत...

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर,याच कालावधीत जिल्ह्यातील ५७४ रुग्णांना सुमारे ४ कोटी ८४ लाख ८१ हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून आरोग्यसेवेला गती...

### सामंजस्य करारातून मदतीचा मार्ग मोकळा...

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत.

# पाईपलाईन फुटल्याने लोहारा खुर्दमध्ये पाणीटंचाई

### संतप्त ग्रामस्थांचा तहसीलदारांना इशारा...



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२५ एप्रिल -**
लोहारा ते नारगवाडी रस्त्याचे काम सुरू असताना लोहारा तालुक्यातील लोहारा खुर्द गावाच्या पाणीपुरवठ्यावर गंभीर परिणाम झाला आहे. रस्त्याच्या कामादरम्यान मुख्य पाईपलाईन जागोजागी फुटल्याने संपूर्ण गावातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून, भर उन्हाळ्यात ग्रामस्थांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर संतप्त ग्राम पंचायतीच्या वतीने नायब तहसीलदार नानासाहेब मोरे यांना निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गावाला पाणीपुरवठा करणारी मुख्य लाईन रस्त्याच्या कामादरम्यान मोठ्या प्रमाणात नुकसानग्रस्त झाली असून नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. उन्हाच्या कडाक्यात ही समस्या अधिकच तीव्र बनली आहे. महिलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनाच याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संत सेवालाल महाराज यांच्या नावाने उभारण्यात आलेले झेंडा कट्टे संबंधित कंत्राटदाराने हटवल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला आहे. या कट्ट्यांचे तातडीने पुनर्बांधकाम करण्यात यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. याशिवाय रस्त्यालगत सुरू असलेले गटारीचे कामही रखडल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. पाणीपुरवठ्याची पाईपलाईन तात्काळ दुरुस्त करून गटाराचे काम सुरू करण्यात यावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

या निवेदनावर शेखर पाटील, उपसरपंच सचिन रसाळ, पुष्पा पाटील, लक्ष्मी रसाळ, केशरबाई कांबळे, अर्चना पाटील, सुनीता सूर्यवंशी, हनुमंत सूर्यवंशी, सुधाकर राठोड, बळी इंगळे, शोभा शेखर पाटील, मुकुंद भैरोबा इंगळे, प्रतिभा सूर्यवंशी, हनुमंत रसाळ, सूरज शेखर पाटील, समर्थ सुनील पाटील आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### मद्यधुंद अवस्थेत दुचाकी चालविल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२५ एप्रिल -**
शहरातील आरोग्य कॉर्नर परिसरात मोटारसायकल (क्र. एम एच २५ बीएच ४७५९) मद्यधुंद अवस्थेत चालवून वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याची घटना समोर आली आहे.

संबंधित चालकाने मोटार वाहन कायद्याच्या कलम १८५ चे उल्लंघन केल्याने पोलिसांनी कारवाई केली.

याप्रकरणी पोलिसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरून संबंधित व्यक्तीविरुद्ध उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.

# थकीत देयकांचा वाद तीव्र; 'विंड वर्ल्ड' पुनरारंभाला स्थानिकांचा विरोध

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२५ एप्रिल -**
विंड वर्ल्ड कंपनीच्या पुनरारंभाच्या हालचालींना वेग आला असला, तरी थकीत देयकांचा प्रश्न अधिकच गंभीर बनत आहे. तब्बल बारा वर्षांपूर्वी प्रकल्प बंद करताना कंपनीने अनेक शेतकरी व कामगारांचे आर्थिक देणे बाकी ठेवून परिसर सोडल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.




स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, कंपनीकडे वाहन भाडे, जमिनींचे भाडे तसेच कामगारांच्या पगारी रक्कमा आजही थकीत आहेत. त्यामुळे कंपनीबाबत परिसरात तीव्र अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकरी व कामगारांनी एकमुखाने भूमिका घेत, आधी थकीत रक्कम द्या, त्यानंतरच कामे सुरू करू देऊ असा ठाम इशारा दिला आहे. काही ठिकाणी स्थानिकांनी बैठका घेऊन आंदोलनाची तयारी सुरू केली असून, हक्काचा पैसा मिळेपर्यंत संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला जात आहे. दरम्यान, कंपनीकडून सब-स्टेशन दुरुस्ती व पवनचक्क्यांच्या देखभालीची प्राथमिक कामे सुरू असली, तरी स्थानिकांचा विरोध कायम राहिल्यास ही कामे ठप्प होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

शेतकरी व कामगारांचा प्रश्न मार्गी लागल्यासच 'विंड वर्ल्ड'च्या पुनरारंभाला गती मिळणार आहे. अन्यथा, हा प्रकल्प पुन्हा संघर्षाच्या वादळात अडकण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

# धाराशिवमध्ये 'डिफेन्स हब'ला हिरवा कंदील; २००० कोटींची गुंतवणूक

### ३ हजार तरूणांना मिळणार रोजगार... आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ एप्रिल -**
जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला नवी दिशा देणारी महत्त्वपूर्ण घडामोड घडली असून, कौडगाव एमआयडीसीमध्ये 'डिफेन्स हब' उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्याचे देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या प्रयत्नांना यश आले असून, 'ग्लोब फोर्ज लिमिटेड' या कंपनीकडून पहिल्या टप्प्यात सुमारे २००० कोटींची गुंतवणूक करण्यात येणार असल्याची माहिती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या प्रकल्पामुळे जिल्ह्यातील सुमारे ३००० तरुणांना थेट रोजगार मिळणार असून, स्थानिक एमएसएमई व पूरक उद्योगांमुळे मोठ्या प्रमाणात अप्रत्यक्ष रोजगारही निर्माण होणार आहे. यामध्ये सुमारे २००० केमिकल व मेकॅनिकल इंजिनियर तसेच १००० इतर कर्मचाऱ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. कौडगाव एमआयडीसीतील सुमारे १००० एकर जागेवर उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पात संरक्षण दलासाठी आवश्यक असलेले टीएनटी आणि प्रोपोलेंटचे उत्पादन होणार आहे. त्यामुळे जिल्हा 'संरक्षण उत्पादन केंद्र' म्हणून जागतिक स्तरावर ओळख निर्माण करण्याच्या दिशेने वाटचाल करणार आहे. या प्रकल्पाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे शेती आणि तंत्रज्ञान यांचा संगम. नेपियर गवतावर आधारित सीबीजी प्लांट उभारण्यात येणार असून, यासाठी लागणारे गवत स्थानिक शेतकऱ्यांकडून खरेदी केले जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल, तसेच सेंद्रिय खतही उपलब्ध होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत कंपनीचे प्रमुख गणेश निबे यांच्यासोबत ८ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या बैठकीनंतर या प्रकल्पाला गती मिळाली. विविध पर्यायांचा आढावा घेतल्यानंतर कौडगाव एमआयडीसी येथील जागेची अंतिम निवड करण्यात आली. भविष्यात या परिसरात सुमारे ५००० एकरवर विस्तारित 'डिफेन्स हब' उभारण्याचेही नियोजन असून, त्यामुळे धाराशिव जिल्ह्यात औद्योगिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली गेली आहे. महाराष्ट्र शासनाने या प्रकल्पाला इंटिग्रेटेड प्रोजेक्ट म्हणून मान्यता दिली आहे.

या प्रकल्पामुळे धाराशिव जिल्हा केवळ शेतीपुरता मर्यादित न राहता देशाच्या संरक्षण उत्पादन क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# १५ दिवसांपासून नळ बंद; डिकसळमध्ये पाणीटंचाई तीव्र

### नगरपरिषदेकडे ग्रामस्थांचा संताप... जनता दरबारात निवेदन सादर...

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२५ एप्रिल -**
डिकसळ येथील गेल्या काही दिवसांपासून विस्कळीत झालेल्या नळ पाणीपुरवठ्यामुळे गावात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून, नागरिकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. या गंभीर प्रश्नाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी ग्रामस्थांनी नगर परिषद कळंब प्रशासनाकडे केली आहे. यासंदर्भात जनता दरबार बैठकीत उपस्थित राहून ग्रामस्थांच्या वतीने मुख्याधिकाऱ्यांना लेखी निवेदन सादर करण्यात आले.



पंचायत समिती कळंबच्या सभापती राजश्री वरपे आणि उपसभापती प्रणिता चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जनता दरबारात डिकसळ येथील नागरिकांनी आपली व्यथा मांडली. काही नागरिकांची पाणीपट्टी थकीत असल्याचे कारण पुढे करून संपूर्ण गावाचा नळ पाणीपुरवठा मागील १५ दिवसांपासून बंद ठेवण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला.

या निर्णयामुळे गावातील अनेक कुटुंबांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. वाढत्या उन्हामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांचे हाल होत असून, नियमित पाणीपट्टी भरणाऱ्या नागरिकांनाही याचा फटका बसत आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या निवेदनावर सरपंच पुष्पा नानासाहेब धाकतोडे, उपसरपंच हरिभाऊ कुंभार, ग्रामविकास अधिकारी चौबारकर यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य व नागरिकांनी सह्या करून प्रशासनाचे लक्ष वेधले.

प्रदीप श्रावण गायकवाड, जनक किसनराव अंबिरकर, सूर्यकांत उत्तम कदम, मनीषा संजय अंबिरकर, अंजली महादेव अंबिरकर, सचिन चंद्रकांत काळे, संगीता लक्ष्मीकांत मुंडे, मुबीन बशीर मणियार, इम्रान नजमोद्दीन मुल्ला, इरशाद रफिक सय्यद, जनक गोरोबा जाधव, शोभा प्रकाश मस्के, मंगल अंकुश वाघमारे, फातिमा अफसर पठाण, शामल अनंत बोराडे व स्वाती गणेश काळे यांचा यात समावेश आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, ज्या नागरिकांकडे पाणीपट्टी थकीत आहे त्यांच्यावर स्वतंत्र कारवाई करावी; मात्र संपूर्ण गावाचा पाणीपुरवठा बंद करणे अन्यायकारक आहे. नियमित कर भरणाऱ्या नागरिकांचा पाणीपुरवठा तात्काळ सुरळीत करावा, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन डिकसळ गावाचा पाणीपुरवठा पूर्ववत करावा, अन्यथा ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

### घागरी मोर्चाचा इशारा...

डिकसळ ग्रामपंचायत सदस्य इम्रान मुल्ला यांनी प्रशासनाला स्पष्ट इशारा दिला आहे की, गावाचा पाणीपुरवठा तात्काळ सुरळीत न झाल्यास नगर परिषद कळंब येथे ग्रामस्थांच्या वतीने घागरी मोर्चा आंदोलन करण्यात येईल.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# नांदेड शहरात एका महिण्यात सहा खून

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २५ एप्रिल -**

नांदेडमध्ये कायदा व सुव्यवस्थेचा पुरता बोजवारा उडाला असून पाच खूनांच्या घटनेनंतर महीनाभरातच आता वाडी परिसरामध्ये २५ वर्षीय तरुणाची धारदार शस्त्राने वार करून निघृण हत्या करण्यात आली आहे. प्रताप दत्ता गायकवाड (वय - २५) असे मृत तरुणाचे नाव आहे.

नांदेड शहरातील वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर नांदेडच्या स्थानिक गुन्हे शाखेत मोठे फेरबदल करण्यात आले होते. पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांची तडकाफडकी बदली करण्यात आली आणि पोलीस निरिक्षक अतुल भोसले यांच्याकडे पदभार देण्यात आला. शुक्रवारी सकाळीत त्यांनी पदभार स्वीकारला. त्यानंतर २४ तासात नांदेडमध्ये पुन्हा एक खून झाला. घराकडे जाणाऱ्या प्रताप गायकवाड याच्यावर तिघांनी सपासप वार केले. रात्री १२ वाजून ४५ मिनिटांनी ही घटना घडली. जुन्या वादातून ही हत्या झाल्याची माहिती मिळत आहे.

प्रताप गायकवाड आणि सुरज बुक्करे यांच्यात वाद झाला होता. हा वाद मारामारीपर्यंत पोहोचला होता. त्यावेळी सुरजच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. त्याच्यावर मोठी शस्त्रक्रियाही कण्यात आली होती. याचाच बदला म्हणून सुरज बुक्करे, विजय वायवळ आणि सोनु उर्फ अनिकेत बुक्करे या तिघांनी प्रतापवर धारदार शस्त्राने हल्ला केला. या हल्ल्यात प्रताप गंभीर जखमी झाला होता. उपचारासाठी रुग्णालयात नेईपर्यंत त्याचा मृत्यू झाला.

दरम्यान, या हल्ल्याची माहिती मिळताच भाग्यनगर पोलीस स्थानकाचे पथक आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पथक घटनास्थळी दाखल झाले. या प्रकरणी पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले असून एकाचा शोध सुरू आहे.

# नांदेडमध्ये शिक्षण सेवकांच्या कॅण्डल मार्चने वेधले लक्ष
## निधन झालेल्या शिक्षण सेवकांना वाहिली श्रध्दांजली

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २५ एप्रिल -**

शिक्षण सेवक म्हणून रूजू असताना अकाली निधन झालेल्या राज्यातील शिक्षण सेवकांना श्रध्दांजली वाहण्यासाठी, शिक्षण सेवकांच्या न्याय हक्कांसाठी व मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी शुक्रवारी सायंकाळी नांदेडमध्ये शिक्षण सेवक कृती समिती, नांदेडच्यावतीने महात्मा फुले चौकात कॅण्डल मार्च काढण्यात आला. तत्पूर्वी समाजसुधारक महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याला सर्व शिक्षकांनी अभिवादन केले.



नियमित शिक्षकांच्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या शिक्षण सेवकांना सेवा कालावधीत कोणतीही सुरक्षा मिळत नाही. शिक्षण सेवकांचा मृत्यू झाल्यास त्यांचे कुटुंब उघड्यावर पडते व मयतांच्या कुटुंबावर दुखाचा डोंगर कोसळतो, ही मोठी शोकांतिका आहे. शिक्षण सेवक कालावधीत शिक्षकांना अल्प मानधनावर सेवा करावी लागते. मयतांच्या वारसांना नोकरी देत आर्थिक लाभ द्यावे. शिक्षण सेवकांना सर्व प्रकारचे सेवा संरक्षण लागू करावे अशा शिक्षण सेवकांच्या मागण्या आहेत. तसेच शिक्षण सेवक कालावधी रद्द करण्याची मागणी अनेक शिक्षक संघटनांनी आजपर्यंत केली आहे. न्यायालयात सध्या दाखल असलेल्या शिक्षण सेवक रद्द याचीकेबद्दल सरकार आपली भूमिका स्पष्ठ मांडत नसून वेळकाढूपणा करत असल्याचे चित्र दिसून येत आहे. शिक्षण सेवकांच्या प्रश्नांबाबत शासनाचे सातत्याने दुर्लक्ष होत आहे.

त्यामुळे शासनाने शिक्षण सेवकांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून न्याय द्यावा अशी मागणी कॅण्डल मार्च नंतर झालेल्या आदरांजली सभेत शिक्षण सेवक कृती समिती नांदेडच्यावतीने करण्यात आली.

यावेळी प्रा. डॉ. विनोद चव्हाण यांनी शिक्षण सेवकांच्या प्रलंबित मागण्यांकडे सरकार दुर्लक्ष करत असल्याचे सांगितले. शिक्षण सेवकाचे निधन झाल्यास शासनाकडून कुटुंबियांना कोणतेही संरक्षण मिळत नाही. आपल्या मागण्या पदरात पडून घेण्यासाठी सर्व शिक्षण सेवकांनी एकत्र यावे व शिक्षण सेवक कालावधी रद्द करण्यासाठी व्यापक लढा उभारावा असे सांगितले.

प्रा. आकाश करंडे आपल्या मनोगतात म्हणाले की मुळात २०२३ मध्ये टेटची परीक्षा झाल्यानंतर जी भरती प्रक्रिया २०२३ मध्येच होण्याची अपेक्षा होती त्या भरती प्रक्रियेला २०२४ आणि २०२५ उजाडला जवळपास यामध्येच शिक्षण सेवकांचे दोन वर्ष वयाची वाढत गेली यामध्ये सरासरी लागलेल्या शिक्षण सेवकांचे वय हे ३३-३५ वर्ष असून त्यांना अजून तीन वर्ष तुटपुंज्या पगारावर काम करावे लागत आहे ही फार मोठी शोकांतिका आहे त्याचबरोबर त्यांना इतर सुविधा सुद्धा नाहीत, महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यांमध्ये नोबेल व्यवसाय असलेल्या शिक्षकांवर ही पाळी येणं हे फार मोठे दुर्दैव आहे.

कॅण्डल मार्च मध्ये प्रा डॉ. विनोद चव्हाण, प्रा. आकाश करंडे, प्रा. लक्ष्मण कोकाटे, प्रा. डॉ. गजानन ढोणे, प्रा. हनुमंत इंगळे, प्रा. तिरुपती पाटील, प्रा. प्रदीप जाधव, प्रा. अक्षय वडजे, प्रा. जयंत जोशी, प्रा. आदिनाथ पायघन, प्रा. आदित्य गोडबोले, प्रा. शिवलिंग चोंडे, प्रा. किरण बिचकुंदे, प्रा. बापू खुरंगे, प्रा. अंकिता वडजे, प्रा. प्रतीक्षा सुर्वे, प्रा नेहा बोरकर, प्रा. राहुल टिचुकले, प्रा. कैलास पाटील, प्रा. गजानन चौधरी, मधुकर शेवाळे, लक्ष्मीकांत पोगुलवाड, दिनेश चाटसे, महेश श्रीरामे, राहुल पवाडे, गिड्डेअण्णा धोत्रे यांच्यासह विविध शाळा, महाविद्यालयातील नवनियुक्त शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## शितल हंबर्डे यांना पी.एचडी. प्रदान

**नवीन नांदेड** -स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुलातील विद्यार्थिनी शितल देविदासराव



हंबर्डे यांना इंग्रजी विषयात नुकतीच आचार्य (पीएच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली आहे. दिनांक २४ एप्रिल २०२६ रोजी पार पडलेल्या मौखिकी परीक्षेत त्यांना यशस्वी घोषित करण्यात आले. विशेष म्हणजे, विष्णुपुरी नगरीतून ही सर्वो च्च पदवी संपादन करणाऱ्या त्या पहिल्या महिला ठरल्या आहेत. शितल देवीदासराव हंबर्डे यांनी निवडक नयनतारा सहगल आणि अनिता देसाई यांच्या कादंबऱ्यांमधील लिंगभेदावर आधारित विभाजनाचे चित्रण: एक विषयात्मक अभ्यास (Gender-based Segregation in Selected Novels of Nayantara Sahgal and nita Desai: Thematic Study) या विषयावर आपले संशोधन सादर केले. त्यांनी आधुनिक काळातील दोन दिग्गज लेखिकांच्या साहित्यातून स्त्री-पुरुष भेदाभेद आणि सामाजिक विषमतेच्या पैलूंचे अत्यंत सूक्ष्म विश्लेषण केले आहे. तीच्या या संशोधनासाठी त्यांना डॉ. शैलजा बी. वाडीकर यांच्या मार्गदर्खाली विषयात्मक अभ्यास पूर्ण केला. यावेळी इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. मुस्तजीब खान उपस्थित होते. सदरील पीएचडी प्राप्त झाल्याबद्दल प्राध्यापक , शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,नातेवाईक यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## धर्माबाद येथे हिंदू महासंमेलन सभा

**धर्माबाद** -धर्माबाद येथे दि. २२ एप्रिल रोजीजातीपाती विसरूनी जाऊ, हिंदू सारे एक होऊया घोषणांनी धर्माबाद शहर दणाणून गेले, निमित्त होते भव्य हिंदू महासंमेलनाचे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त देशभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून, त्याच पार्श्वभूमीवर धर्माबाद येथे भव्य हिंदू महासंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या महासंमेलनानिमित्त सायंकाळी पाच वाजता श्री.स्वामी समर्थ केंद्र येथून भव्य दिव्य शोभायात्रेला प्रारंभ झाला. शोभायात्रेमध्ये महिला,युवक, पुरुष व लहान मुलांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. पारंपरिक व सांस्कृतिक वातावरणात कलशधारी महिला,भगवे झेंडे, तसेच देवी-देवतांच्या देखावे श्रीराम,लक्ष्मण, सीता,हनुमान,भारत माता असे अनेक देखाव्यांनी शोभायात्रेला आकर्षक स्वरूप प्राप्त झाले. धर्माबाद शहरातील मुख्य मार्गांवरून ही शोभायात्रा मोठ्या उत्साहात पार पडली. सायंकाळी सात वाजता गुजराती कॉलनी मैदान येथे हिंदू महासंमेलन सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत प्रमुख वक्ते इंद्रजीत बैस व स्वामी वेंकटेशाचार्य महंत यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी देव, देश,धर्म आणि संस्कृती यांचे जतन व संवर्धन करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाचे आयोजन धर्माबाद येथील सकल हिंदू समाज व युवकांच्या वतीने करण्यात आले होते.

# नांदेड काँग्रेस जिल्हाध्यक्षांच्या नियुक्तीत सृजन होणार की सरंजाम !
## दक्षिणमध्ये डॉ.मनूरकर,केदार पाटील, प्रकाश भगनुरे पाटील चर्चेत

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २५ एप्रिल -**

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या वतीने महाराष्ट्रात संघटन सृजन अभियान राबविण्यात आले. निरीक्षकांनी अहवालही हायकमांडकडे पाठविला. पण या नांदेड काँग्रेस जिल्हाध्यक्षांच्या नियुक्तीमध्ये नेमके सृजन होणार की सरंजाम, अशी चर्चा जनतेत सुरू झाली आहे. नांदेड दक्षिणमध्ये मात्र डॉ.भगवान मनूरकर, केदार पाटील साळुंके आणि प्रकाश भगनुरे पाटील यांच्या नावाची चर्चा सुरू आहे.

दि. ९ एप्रिलपासून हे अभियान सुरू झाले आणि त्याची सांगता देगलूर येथे झाली. प्रत्येक विधानसभा मतदारसंघाच्या ठिकाणी निरीक्षकांनी चाचपणी केली. या चाचपणीमध्ये प्रस्थापित इच्छुक उमेदवारांनी आतमध्ये जाऊन माझेच नाव जिल्हाध्यक्ष पदासाठी सुचवा, अशी गळ आपल्याच माणसांना घातली. ही बाब निरीक्षकांच्या पूर्णपणे लक्षात आली. काही ठिकाणी प्रस्थापित नेत्यांनी आपलीच माणसे इच्छुक म्हणून समोर आणले. ही बाबही लपून न राहता निरीक्षकांना कळून आली.

केंद्रीय निरीक्षकांनी या सृजन अभियानाचा उद्देश खूप खोलात जाऊन सांगितला. जिल्हाध्यक्ष निवडीत खूप पारदर्शकता असल्याचे सांगितले. अभियान संपले. इच्छुकांचा अहवाल हायकमांडकडे गेला. पण सध्या संपूर्ण जिल्ह्यात एकच चर्चा सुरू आहे. ती म्हणजे स्थानिक नेत्यांच्या मनात जो असेल, तोच जिल्हाध्यक्ष होणार ! नवीन नियुक्त होणारा काँग्रेसचा जिल्हाध्यक्ष हा विरोधी पक्षाच्याही कानाखालचा असला पाहिजे, अशीही एक विचारधारा सुरू आहे. मग असे असेल तर हायकमांडने स्थानिकच्या त्या नेत्याकडूनच अहवाल घ्यायला पाहिजे होता आणि आपल्या मनातील जिल्हाध्यक्षांच्या नावाची चिठ्ठी हायकमांड किंवा प्रदेश कमिटीकडे द्यायला हवी होती, असे काँग्रेस पक्षातील सामान्य कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.

नांदेड उत्तरचे जिल्हाध्यक्ष राजेश पावडे यांची नियुक्ती होऊन एक वर्षही पूर्ण झालेले नाही. मग त्यांचे काम पाहण्याच्या अगोदरच त्यांना बदलणार का? असाही कार्यकर्त्यांचा प्रश्न आहे. उत्तरमध्ये राजेश पावडे, विठ्ठल पावडे, डॉ.रेखाताई चव्हाण, डॉ.बाबा गौड पाटील, पप्पू कोंडेकर इच्छुक आहेत.

नांदेड दक्षिणमध्ये सध्या जिल्हाध्यक्ष असलेले हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, केदार पाटील साळुंके, डॉ.भगवानराव मनूरकर, प्रकाश भगनुरे पाटील, संजय पाटील शेळगावकर, संजय बेळगे, संजय भोसीकर,रामदास पाटील सोमठाणकर यांची नावे चर्चेत आहेत. या सर्व इच्छुकांनी मुलाखतीही दिल्या आहेत.तत्कालीन प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांची प्रभारी जिल्हाध्यक्ष म्हणून नियुक्ती केली होती. केदार पाटील यांनी प्रदेशवर काम केले आहे. डॉ.भगवान पाटील मनूरकर हे शेतकरी आंदोलनातील नेते आहेत. प्रकाश भगनुरे पाटील यांचा ३० वर्षांचा पत्रकारितेचा अनुभव आहे. स्थानिक राजकारणाबरोबरच पिढीजात काँग्रेस कुटुंबातून आलेले भगनुरे पाटील यांनी रोजगार व स्वयंरोजगार विभागात प्रदेश सचिव म्हणून काम केले आहे. त्यांचा राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनुभव व जनसंपर्क दांडगा आहे. संजय पाटील शेळगावकर हे स्वच्छता दूत माधवराव पाटील शेळगावकर यांचे चिरंजीव आहेत.

नांदेड शहर जिल्हाध्यक्ष पदासाठी अब्दुल गफार, महेश देशमुख, सुरेंद्र घोडजकर, बालाजी चव्हाण, शफिक कुरेशी, स.शेरअली यांची नावे चर्चेत आहेत. नांदेड काँग्रेसच्या तिन्ही जिल्हाध्यक्षपदाच्या नियुक्तीचा निकष काय ? इच्छुकांचा बायोडाटा पाहणार की नेत्यांची शिफारस ? नवनियुक्त जिल्हाध्यक्ष काँग्रेस पक्षाला नवसंजीवनी देणारा हवा, की कुणाच्या तरी अधिपत्याखाली काम करणारा हवा. या सर्व बाबींचा विचार काँग्रेस हायकमांड आणि प्रदेश काँग्रेसने करावयाचा आहे. तरच काँग्रेसचे संघटन सृजन अभियान यशस्वी झाले, असे म्हणता येईल. अन्यथा, नेहमीप्रमाणेच जिल्हाध्यक्षांच्या नियुक्त्या तोंड पाहून झाल्या तर सृजन ऐवजी सरंजाम पद्धतीनेच नियुक्ती झाल्या, असे सामान्य कार्यकर्त्यांना वाटल्याशिवाय राहणार नाही.

# देगलूर महावितरणच्या नवीन विभागीय कार्यालयासाठी सव्वा कोटींचा निधी मंजूर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २५ एप्रिल -**

देगलूर महावितरण विभागाच्या विकासाला गती देणारा निर्णय अखेर साकार झाला असून महावितरणच्या नवीन विभागीय कार्यालयाच्या स्वतंत्र इमारतीसाठी तब्बल १ कोटी २६ लाख ७८ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे देगलूरसह परिसरातील वीज व्यवस्थापन अधिक सक्षम व कार्यक्षम होणार असल्याचे चित्र आहे.

देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघाचे आ. जितेश अंतापूरकर यांनी या संदर्भात सातत्याने पाठपुरावा करत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. त्यांच्या या प्रयत्नांना अखेर यश आले असून मुख्यमंत्री फडणवीस यांनी या प्रस्तावाची तात्काळ दखल घेत निधी मंजूर केला आहे.

नवीन विभागीय कार्यालयाच्या इमारतीमुळे महावितरणच्या कामकाजाला स्वतंत्र व सुसज्ज सुविधा मिळणार आहेत. यामुळे नागरिकांना वीजसंबंधित सेवा अधिक जलद आणि सुलभ पद्धतीने उपलब्ध होणार आहेत. तसेच, प्रशासनिक



कार्यक्षमता वाढून तक्रार निवारण प्रक्रियेलाही गती मिळणार आहे.

दरम्यान, मंजूर निधीच्या प्रक्रियेला लवकरच अंतिम स्वरूप दिले जाणार असून प्रत्यक्ष बांधकाम कामालाही लवकरच सुरुवात होणार असल्याची माहिती मिळाली आहे. या निर्णयामुळे देगलूरच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळणार असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

**आ.अंतापूरकर यांचा डबल धमाका**

आरोग्य क्षेत्र माझ्या मतदारसंघात भक्कम उभारली पाहीजे सर्वसामान्य नागरीकांना आरोग्य सुविधा सुलभतेने मिळाली पाहीजे यासाठी अविरत पाठपुरावा करुन देगलूरच्या श्रेणीवर्धन दवाखाना बांधकामासाठी आ.अंतापूरकरांनी पाठपुरावा करुन भरीव निधि मंजूर करुन घेतली होती आता महावितरण विभागाचे विभागीय कार्यालय बांधकामासाठी निधी मंजूर करुन आणल्याने आ.अंतापूरकर यांच्या विकासप्रेम वृत्तीचे मतदारसंघात कौतूक होत आहे.

# लोहा शहर हरित व स्वच्छ करण्यासाठी सर्वांच्या सहकार्याची गरज : आ. चिखलीकर

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. २५ एप्रिल -**

लोहा शहर हरित व स्वच्छ झाले पाहिजे त्यातही सर्वपक्षीय नेत्यांची कार्यकर्त्यांची व शहरातील जनतेची साथ पाहिजे तेव्हा येत्या पावसाळ्यात शहरातील सर्वच भागात ५१ हजार वृक्ष लागवड करण्याचा व तो टिकविण्याची मोहीम राबविण्यात येणार आहे यासाठी शाळा महाविद्यालये तसेच वृक्षप्रेमी यांचे सहकार्य लागणार आहे .लोहा शहर हरित शहर-स्वच्छ शहर व्हावे यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करू असा विश्वास प्रतिमा तयार व्हावीत विधीमंडळ उपविधान समितीचे अध्यक्ष आ. प्रतापराव पाटील चिखडीकर यांनी व्यक्त केला.

लोहा शहरात शनिवार (२५ ( एप्रिल) रोजी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते एक कोटी रुपयांच्या विकास कामाचा शुभारंभ झाला .ज्यात प्रभाग एक सायाळ रोड ते मारोती मंदिर सीसी रस्ता ३० लक्ष रुपये प्रभाग सहा शिक्षक कॉलनी २५ लक्ष रुपये सीसी रोड व नाली , १० लक्ष रुपये श्रीकृष्ण मंदिर सभागृह तर प्रभाग दहा जुन्या शहरात ५० लक्ष रुपयाचा सिमेंट



रस्त्याचे भूमिपूजन पार पडले.

नगराध्यक्ष शरद पवार, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार उपनगराध्यक्ष करिम शेख, माजी नगराध्यक्ष केशवराव मुकदम, मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे माजी उपनगराध्यक्ष दता वाले, माजी उपसभापती बालाजी पाटील, छत्रपती धुतमल शिउबाठा तालुका प्रमुख भीमराव पाटील शिंदे, ऋषी पाटील, गटनेते भास्कर पवार, नगरसेवक हरिभाऊ चव्हाण, श्याम पाटील पवार, बालाजी खिल्लारे, नगरसेवक सदाशिव तेलंग, पार्वतीबाई जंगले, लक्ष्मी धुतमल, पुजा खिल्लारे, सुशीलादेवी परिहार भागावाई पवार, माधुरी बोडके, सौ.मांजलवाड, सुशीलाबाई कहाळेकर, अविनाश पवार, गणेश बगाडे, तुकाराम दाढेल, सतीश निखाते, नामदेव पाटील पवार, बी. डी. जाधव, मारुती पाटील बोरगावकर, आणासाहेब पवार,माजी नगरसेवक बालाजी भोसीकर, गंगाधर महाबळे यासह सर्व नगरसेवक आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते.

नगराध्यक्ष शरद पवार व टीम यांना पद्भार स्विकारून १०० दिवस झाली. या काळात बॅनर मुक्त दुकाने, सात वर्षाच्या खंड नंतर मुख्य रस्त्यावर तिरंगा लाईड, शहरात स्वच्छता, उन्हाळी पाणी टंचाई निवारण, प्रथदिवे वाचनालयासाठी पुस्तके अशी उप्क्रमे राबविली. युवा नेते प्रविण पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वात ही टीम शहराच्या विकासासाठी कार्यरत आहे.

आ. प्रतापराव पाटील म्हणाले की शहरात नगराध्यक्ष शरद पवार व त्याची टीम चागले काम करत आहे पण शहर हरित व स्वच्छ राहण्यासाठी सर्व पक्षीयाची तसेच नागरिकाची साथ पाहिजे. येत्या पावसाळ्यात शहराच्या आजूबाजूला व शहरात जेथे शक्य आहे तेथे वृक्ष लागवड करावी, शाळा महाविद्यालय यांचा सहभाग घ्यावा. वृक्षारोपण केल्यानंतर त्याचे संवर्धन झाले पाहिजे असे सांगून रस्ते दजदार व्हावीत असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सायाळरोड, कृष्णा मंदिर, जुना लोहा येथे आ.चिखलीकर व मान्यवरांच्या हस्ते नारळ फोडून कामाचा शुभारंभ झाला.

## तहानलेल्या जंगलाचा आक्रोश!
# दुर्मिळ काळवीट मृत अवस्थेत आढळलं

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. २५ एप्रिल -**

वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे पाण्याच्या शोधात भटकंती करत असलेल्या दुर्मिळ समजल्या जाणाऱ्या हरिण प्रजातीतील नर काळवीट मृत अवस्थेत आढळल्याची धक्कादायक घटना शुक्रवार (दि. २४) रोजी सकाळी सुमारे दहा वाजताच्या सुमारास इस्लापूर परिसरातील शिवारात उघडकीस आली. या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास ही बाब आल्यानंतर तत्काळ वनविभागाला माहिती देण्यात आली. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन आवश्यक ती प्रक्रिया सुरू केली. प्राथमिक निरीक्षणात काळवीट काही काळापासून अशक्त अवस्थेत असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

उन्हाळ्याच्या दिवसांत नैसर्गिक पाणीस्रोत आटत चालल्याने वन्य प्राण्यांना पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात भटकंती करावी लागत असल्याचे चित्र आहे. यामुळे अशा घटनांची



शक्यता वाढत असल्याची चिंता व्यक्त होत आहे.

दरम्यान, शवविच्छेदनासाठी मृतदेह हलवावा लागला. पशुवैद्यकीय सुविधा तात्काळ उपलब्ध नसल्याने काही अंतरावर नेऊन पुढील प्रक्रिया पार पाडण्यात आली. या घटनेमुळे वन्यजीवांसाठी आवश्यक असलेल्या आपत्कालीन सुविधांबाबतही प्रश्न निर्माण झाले आहेत.

इस्लापूर परिसरातील हरीण पठारावर मोठ्या प्रमाणात हरिण, रोही (काळवीट) आणि नीलगाय यांसारखे वन्य प्राणी आहेत. मात्र, पाण्याच्या अभावामुळे त्यांच्या अस्तित्वावरच संकट निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे.

या पार्श्वभूमीवर वन्यजीवांसाठी शाश्वत पाणीव्यवस्था उभारण्याची गरज अधोरेखित होत असून, संबंधित विभागाने तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.

# मुदखेड नगरपरिषदेचा स्तुत्य उपक्रम: १३७ दिव्यांग बांधवांना धनादेश वाटप

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २५ एप्रिल -**

मुदखेड नगरपरिषदेच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत शहरातील दिव्यांग बांधवांसाठी मदतीचा हात पुढे करण्यात आला आहे. नगरपरिषदेच्या स्वनिधीतून (करवसुलीच्या ५% निधी) एकूण १३७ दिव्यांग लाभार्थ्यांना प्रत्येकी ३२०० रुपयांच्या देयकाचे (धनादेश) वाटप दि.२४ एप्रिल रोजी करण्यात आले.

नगरपरिषद कार्यालयातील सभागृहात आयोजित या कार्यक्रमाचे नियोजन मुख्याधिकारी जगदीश दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. यावेळी लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ. विश्वांतीताई कदम, यांच्यासह विविध



प्रभागांचे नगरसेवक, नगरसेवक प्रतिनिधी तसेच पालिकेचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**करवसुलीतील ५% हिस्सा दिव्यांगांच्या कल्याणासाठी**

या प्रसंगी बोलताना नगराध्यक्षा सौ. विश्रांतीताई कदम यांनी माहिती दिली की, नगरपरिषदेने जमा केलेल्या एकूण करवसुलीतील ५% वाटा हा दिव्यांग बांधवांच्या कल्याणासाठी खर्च करण्यात येत आहे. या अंतर्गत आज एकूण ४,३८,४०० रुपयांच्या निधीचे वाटप १३७ लाभार्थ्यांना करण्यात आले. दिव्यांग बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांना आर्थिक आधार देण्यासाठी आमचे प्रशासन सदैव तत्पर आहे,तसेच पुढील नियोजनाबाबत माहिती देताना नगराध्यक्षा सौ. विश्रांतीताई कदम यांनी सांगितले की, येणाऱ्या काळात खा. अशोक चव्हाण आणि आ.श्रीजया चव्हाण यांच्या उपस्थितीत शहरात एक भव्य-दिव्य कार्यक्रम आयोजित केला जाईल. या माध्यमातून दिव्यांग बांधवांसाठी शासनस्तरावरून जास्तीत जास्त मदत आणि विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

या उपक्रमामुळे शहरातील दिव्यांग बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण असून, नगरपरिषदेच्या या निर्णयाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नगरपरिषदेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी नगरसेवक शाम आण्णा चंद्रे, संजय आऊलवार, अविनाश चौदंते,खदीर भाई, मुजीब पठाण, बबलु सेठ किराणावाले, सौ.निकीता सोनटक्के, शोभाबाई चमकुरे, नगरसेवक प्रतिनिधी दैवशाला पांचाळ, तसेच बेरोजगार दिव्यांग संघर्ष समिती मुदखेडचे शहराध्यक्ष शेख रफीक ऊर्फ बाबा भाई,तालुका अध्यक्ष महम्म आजीस,महिला अध्यक्ष पारुबाई मुसलवाड,मनोज बोकेफोड, प्रहार संघटनेचे तालुका अध्यक्ष संजय पाटील, अनिल शेट्टे पाटील, शंकर शिंदे पाटील, सौ.केशरताई शिंदे, सुनिता रेगुलवार, अशोक अंबरखाने, शिवाजी पांचाळ,मनोज वट्टमवार, मारोती गुडमलवार,अस्लम,प्रभु, नगरपरिषद कर्मचारी नगरपालिकेच्या प्रियंका मॅडम, होटकर मॅडम,अनंत कुलकर्णी, रमेश सावंत, शशिकांत पौळ,राहुल चौदंते, नगरपरिषद कर्मचारी दिव्यांग बांधव यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# मराठवाड्यात प्रथमच 'स्मार्ट नॅव्ह'च्या मदतीने 'नेक्सा' कोक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वी

## डॉ. हेडगेवार रुग्णालयात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर; अचूकता, सुरक्षितता आणि परिणामकारकतेत मोठी वाढ

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर** | छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. हेडगेवार रुग्णालयातील 'किमया कॉक्लीअर इम्प्लांट सेंटर'मध्ये अत्याधुनिक 'स्मार्ट नॅव्ह' तंत्रज्ञानाच्या साहाय्याने 'नेक्सा' कोक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली. मराठवाड्यातील ही पहिलीच अशी शस्त्रक्रिया असून, श्रवणदोष असलेल्या रुग्णांसाठी नवे आशादायी पाऊल मानले जात आहे.

श्रवणदोष असलेल्या जालना येथील एका रुग्णावर छत्रपती संभाजीनगरमधील डॉ. हेडगेवार रुग्णालयाच्या 'किमया कॉक्लीअर इम्प्लांट सेंटर'मध्ये 'स्मार्ट नॅव्ह' तंत्रज्ञानाचा वापर करून 'नेक्सा' कोक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करण्यात आली. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे शस्त्रक्रियेची अचूकता, सुरक्षितता आणि परिणामकारकता आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचल्याचे मानले जात आहे.

सदर सेंटरमध्ये आतापर्यंत ३०० हून अधिक कोक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाल्या असून 'नेक्सा' तंत्रज्ञानामुळे श्रवणबाधित रुग्णांच्या आयुष्यात नव्या आशा निर्माण होत आहेत.

कोक्लिअर इम्प्लांटच्या माध्यमातून जन्मतः किंवा नंतर उद्भवलेल्या श्रवणदोष असलेल्या रुग्णांना ऐकण्याची क्षमता प्राप्त होते. या शस्त्रक्रियेत जागतिक स्तरावरील 'कोक्लिअर' कंपनीने विकसित केलेल्या 'कोक्लिअर न्युक्लिअस कॅन्सो ३ साऊंड प्रोसेसर विथ



नेक्सा इम्प्लांट' प्रणालीचा वापर करण्यात आला.

'नेक्सा' तंत्रज्ञानाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे त्याचे 'फर्मवेअर अपग्रेडेबल' असणे. त्यामुळे भविष्यात नवीन बाह्य उपकरणे सहज जोडता येतात आणि रुग्णाला पुन्हा शस्त्रक्रिया करण्याची आवश्यकता भासत नाही. हे तंत्रज्ञान श्रवण नसांना अचूक उत्तेजन देऊन अधिक स्पष्ट व नैसर्गिक ध्वनी अनुभव देते. परिणामी रुग्णाच्या संवाद कौशल्यात आणि एकूण जीवनमानात लक्षणीय सुधारणा होते.

ही जटिल शस्त्रक्रिया प्रख्यात ईएनटी सर्जन डॉ. भारत देशमुख यांनी यशस्वीरित्या पार पाडली. 'स्मार्ट नॅव्ह' प्रणालीमुळे त्यांना शस्त्रक्रियेदरम्यान रिअल-टाईम मार्गदर्शन मिळाले, ज्यामुळे कानातील नाजूक भागांमध्ये उपकरण अचूकपणे बसविणे शक्य झाले.

शस्त्रक्रियेनंतर संबंधित रुग्णाच्या श्रवणक्षमतेत सुधारणा होण्याची अपेक्षा असून, त्याच्या संवाद कौशल्य, सामाजिक सहभाग आणि एकूण जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे. रुग्णासाठी स्पीच थेरपी, नियमित मॅपिंग आणि ऑडिओलॉजी रिहॅबिलिटेशनच्या सुविधा देखील रुग्णालयात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

या शस्त्रक्रियेसाठी डॉ. दिपक भिसेगावकर (ईएनटी व कोक्लिअर इम्प्लांट सर्जन), डॉ. धनश्री भिसेगावकर (ऑडिओलॉजिस्ट), मंजिरी ब्रह्मपूरकर (ऑडिओलॉजिस्ट) आणि जीवन जोशी (वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता) यांचे सहकार्य लाभले.

रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक डॉ. महेश देशपांडे, डॉ. अनंत पंढरे, डॉ. अश्विनी कुमार तुपकरी आणि डॉ. सतीश कुलकर्णी यांनी संपूर्ण टीमचे अभिनंदन केले.

# छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर सावली एक हि झाड नाही



**तभा वृत्तसेवा**

फर्दापूर दि 25

फर्दापूर . छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर चौपदरी करण करून सात वर्षे झाली परंतु एक हि झाड जगविले नाही छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर चौपदरी करण करण्यात आले त्यावेळी लाखों जुनी मोठ मोठी झाडे त्यात वड, पिंपळ, कडूलिंब,बाभूळ, निलगिरी अशा असंख्य जातींचे जुनी झाडे तोडली हि झाडे कितेक वर्ष जुनी होती याचा अंदाज नाही त्यामुळे आता या महामार्गावर 42,43 तापमान वाढल्यामुळे प्रवाशी थोडी हि रस्ता रस्त्यावर विश्रांती घेऊ शकत नाही कारण की रस्त्यावर एक हि झाड शिल्लक राहिले नाही त्यामुळे हा महामार्ग झाडाविना उदास दिसतो तरी सरकार म्हणते झाडे लावा झाडे जगवा हि ओळ फक्त कागदावरच राहिली आणि सरकार यांच्या मुखात राहिली कारण या पुढे हि आशेचे तापमान वाढत राहिल कारण कोण एक तरी झाड जगवत नाही मात्र एकीकडे लाखों झाडांची कत्तल होत आहे तरी सरकार ने कडक कायदा कडून झाड थांबून झाडे लावण्याची सक्ती केली पाहिजे

# वांजोळा-के-हाळा वाळू पट्ट्यात अवैध उपसा, जेसीबीसह ट्रॅक्टर जप्त

## टेंडर चालकांनी वाहने पकडून दिली

**सिल्लोड, प्रतिनिधी** | सिल्लोड तालुक्यातील वांजोळा-केऱ्हाळा येथील पूर्णा नदीपात्रातील शासकीय लिलाव झालेल्या वाळू पट्ट्यातून होणारा अवैध वाळू उपसा टेंडर धारकांनी उघडकीस आणला आहे.

टेंडर धारकांनीच मंगळवारी रात्री एक वाजता जेसीबी आणि ट्रॅक्टर पकडून सिल्लोड ग्रामीण पोलिसांच्या स्वाधीन केले. याप्रकरणी बुधवारी सायंकाळी गुन्हा दाखल करण्यात आला.

वांजोळा-केऱ्हाळा वाळू पट्ट्याचा अधिकृत लिलाव झाला असून तेथे दिवसा काम सुरू असते. मात्र, मंगळवारी रात्री विनापरवाना चोरटी वाळू वाहतूक सुरू असल्याची गोपनीय माहिती वाळू पट्टा चालक व भागीदार दुर्गेश राजपुरोहित, फरकाडे आणि यासेर यांना मिळाली. त्यांनी रात्री एक वाजता नदीपात्रात जाऊन पाहिले असता, जेसीबीच्या (एमएच २३ एएस ६५३१) साहाय्याने एका विनाक्रमांकाच्या ट्रॅक्टरमध्ये बेकायदा वाळू भरली जात होती. त्यांनी तत्काळ दोन्ही वाहने पकडून सिल्लोड ग्रामीण पोलिसांना पाचारण केले.

**१३ लाखांचा मुद्देमाल जप्त**

याप्रकरणी पोलीस हेड कॉन्स्टेबल सचिन एकनाथ काळे यांच्या तक्रारीवरून सिल्लोड ग्रामीण पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अवैध वाळू उपसा प्रकरणी जेसीबी आणि ट्रॅक्टर चालक-मालक दशरथ रामकिसन सागरे (वय ३२, रा. केन्हाळा, ता. सिल्लोड) या आरोपीस अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी १३ लाख ५ हजार रुपये किमतीची दोन्ही वाहने आणि एक ब्रास वाळू असा मुद्देमाल जप्त केला आहे.

# क्रीडा भारती सिल्लोड जिल्हा कार्यकारिणी जाहीर; क्रीडा संस्कृती रुजविण्यावर भर

## करमाड, फुलंब्री, सिल्लोड, रत्नापूर व कन्नड भागांचा समावेश; युवकांना संघटित करण्यावर लक्ष

छत्रपती संभाजीनगर विभागांतर्गत क्रीडा भारतीच्या सिल्लोड जिल्हा कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली असून, क्रीडा क्षेत्राचा विस्तार व संघटन बळकटीस प्राधान्य दिले जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

**सिल्लोड** | क्रीडा क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या क्रीडा भारती छत्रपती संभाजीनगर विभागांतर्गत सिल्लोड जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. या जिल्ह्यात करमाड, फुलंब्री, सिल्लोड, रत्नापूर आणि कन्नड या भागांचा समावेश करण्यात आला असून, या सर्व भागांत क्रीडा उपक्रमांचा विस्तार करण्यावर विशेष भर दिला

जाणार आहे.

ही कार्यकारिणी विभागाध्यक्ष श्री. नवीन बगडीया यांच्या हस्ते जाहीर करण्यात आली. नव्याने घोषित कार्यकारिणीत क्रीडा क्षेत्राशी निगडीत उत्साही व कार्यक्षम कार्यकर्त्यांची निवड करण्यात आली आहे.

घोषित कार्यकारिणी पुढीलप्रमाणे – अध्यक्ष आशिष कान्हेड, उपाध्यक्ष बंडू कचकुरे पाटील, बळीराम मुरमे पाटील मंत्री : पुरुषोत्तम खटके सहमंत्री : कृष्णा आढाव, श्री. विनोद कंकाळ कोषाध्यक्ष : रमेश डकले पाटील क्रीडा केंद्र प्रमुख : चंद्रकांत देसले सूर्यनमस्कार प्रमुख : फकीरराव शेलके प्रसिद्धी प्रमुख : रविंद्र जाधव युवा प्रमुख : ज्ञानेश्वर अंभोरे

या नव्या कार्यकारिणीचे देवगिरी प्रांत अध्यक्ष श्री. पंकज भारसाखळे, विभाग उपाध्यक्ष व शिवछत्रपती पुरस्कार विजेते डॉ. विशाल देशपांडे, प्रा. डी. आर. खैरनार पाटील, सचिव प्रा. विनायक राऊत तसेच कोषाध्यक्ष प्रा. गणपत पवार यांनी अभिनंदन केले.

यावेळी बोलताना विभागाध्यक्ष नवीन बगडीया म्हणाले की, "सिल्लोड जिल्ह्यात क्रीडा संस्कृती रुजविणे, युवकांना संघटित करणे आणि विविध क्रीडा उपक्रम राबविणे हे या कार्यकारिणीचे प्रमुख उद्दिष्ट राहील." दरम्यान, नव्याने नियुक्त कार्यकारिणीकडून आगामी काळात विविध क्रीडा स्पर्धा, प्रशिक्षण शिबिरे तसेच सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

# सोयगाव बस आगारातील वाहतूक निरीक्षक संतिष अंभोरे यांना निरोप



**तभा.वृत्तसेवा**

सोयगाव,दि.२५ एप्रिल

सोयगाव बस आगारातील अभ्यासू, संयमी,कर्तव्य तत्पर वाहतूक निरीक्षक सतिष अंभोरे यांची सोयगाव बस आगारातून प्रशासकीय बदली सिल्लोड येथे झालेने त्यांचा सोयगाव बस आगार प्रमुख मनिष जवळेकर यांचे उपस्थितीत त्यांना पुढील कारकिर्दीसाठी शुभेच्छा देऊन निरोप देण्यात आला.यावेळी सहाय्यक वाहतूक निरीक्षक कैलास बागुल, ज्ञानेश्वर गौरे,कामगार संघटनेचे अध्यक्ष दिपक पाटील,कार्यकारी अध्यक्ष पंजाबराव कुणगर,लेखाकार विनोद जाधव,वरिष्ठ लिपिक सतिष पाटील,आगार सचिव संतोष पाखरे, जयराम सूर्यवंशी,निलेश पाटील, अशोक तायडे,विष्णू सोनवणे, सुशील मोरे,ज्ञानेश्वर गोरे,सांडू खरात, जितू संपकाळ,आगार सचिव परमेश्वर गवळे,जितू विनोद सुरडकर, सांडू खरात, सुरेश मोरे,गणेश वर्मा,पाळी प्रमुख प्रदिप जाधव यांचेसह मोठ्या संख्येने कर्मचारी उपस्थितीत होते.

# ऐतिहासिक छत्रपती संभाजीनगरात १७ वर्षांखालील राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेचा जल्लोष

## 28 राज्यांतील 840 खेळाडूंचा सहभाग; महिला, फ्री-स्टाईल व ग्रीको-रोमन प्रकारांत सामने

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी** | देशभरातील युवा कुस्तीपटूंची नजर आता ऐतिहासिक छत्रपती संभाजीनगरकडे लागली असून, येथे १७ वर्षांखालील राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. तीन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेमुळे शहरात क्रीडामय वातावरण रंगणार आहे.

भारतीय कुस्ती महासंघाच्या मान्यतेने महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ आणि कुस्तीगीर असोसिएशन छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने १७ वर्षांखालील राष्ट्रीय कुस्ती स्पर्धा दि. २८ ते ३० एप्रिल २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आली आहे.



या स्पर्धेत महिला कुस्ती, मुलांची फ्री-स्टाईल कुस्ती आणि ग्रीको-रोमन कुस्ती अशा तीन प्रकारांचा समावेश असून, देशातील २८ राज्यांमधून तब्बल ८४० खेळाडू सहभागी होणार आहेत. याशिवाय ८४ प्रशिक्षक व संघव्यवस्थापक, २८ पदाधिकारी आणि सुमारे ५० अधिकारी अशा एकूण १००२ जणांची उपस्थिती राहणार आहे.

स्पर्धा विभागीय क्रीडा संकुल, छत्रपती संभाजीनगर येथे पार पडणार असून, सहभागी खेळाडूंसाठी प्रशस्त हॉटेलमध्ये निवास व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच भोजन व वाहतूक सुविधांचीही योग्य सोय आयोजकांकडून करण्यात आली आहे.

महाराष्ट्र कुस्तीगीर संघाचे सरचिटणीस हिंद केसरी योगेश दोडके, कुस्तीगीर असोसिएशन छत्रपती संभाजीनगरचे अध्यक्ष आमदार प्रदीप जैस्वाल, तांत्रिक सचिव दिनेश गुंड, वरिष्ठ उपाध्यक्ष फुलचंद सलामपुरे व सचिव शरद कचरे यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

स्पर्धेचे स्वागताध्यक्ष नगरसेवक ऋषिकेश जैस्वाल असून, आयोजन यशस्वी करण्यासाठी स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत. अधिक माहितीसाठी आयोजकांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# जागतिक वसुंधरा दिनानिमित्त संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात कार्यक्रम उत्साहात



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२५ एप्रिल

येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील भूगोल विभागातर्फे जागतिक वसुंधरा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा व प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार हे उपस्थित होते.प्रमुख मार्गदर्शक म्हणून वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.डॉ.निलेश गावडे यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व,वाढते प्रदूषण आणि शाश्वत विकास याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी "वसुंधरा ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे,तिचे संरक्षण करणे ही काळाची गरज आहे,"असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमामध्ये पर्यावरण संवर्धन,वृक्षारोपण आणि स्वच्छता याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात आली.विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांद्वारे वसुंधरेच्या रक्षणाचा संदेश दिला.या कार्यक्रमाचे आयोजन भूगोल विभाग प्रमुख प्रा.डॉ.शत्रुघ्न उद्धव भोरे,तसेच प्रा. डॉ.पंकज शिंदे यांनी केले.कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकवृंद,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांची मृद व जलसंधारण विभागाच्या सचिव पदावर बदली

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांची मंत्रालय, मुंबई येथे मृद व जलसंधारण विभागाच्या सचिव पदावर बदली करण्यात आली आहे. ते नवीन पदाचा कार्यभार माणिक गुरसळ (भाप्रसे) यांच्याकडून स्वीकारणार आहेत. या बदलीबाबतचे आदेश कालच शासनाकडून निर्गमित करण्यात आले आहेत. नुकतेच जितेंद्र पापळकर यांनी छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त पदाचा कार्यभार जी. श्रीकांत यांच्याकडे सोपविला होता.

# विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्याकडून आढावा; कामे गुणवत्तापूर्ण करण्याचे निर्देश

**छत्रपती संभाजीनगर** | शहराला मे 2026 पर्यंत पाणीपुरवठा करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या नवीन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत जायकवाडी ते नक्षत्रवाडी येथील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पाणी पोहोचविण्याची चाचणी यशस्वी झाली आहे. उर्वरित कामे योग्य व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याबाबत विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी आज आढावा घेत संबंधितांना निर्देश दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयातील सभागृहात त्यांच्या अध्यक्षतेखाली शहर पाणीपुरवठा योजनेचा आढावा घेण्यात आला. या बैठकीस मनपा आयुक्त अमोल येडगे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुख्य अभियंता मनीषा पलांडे, कार्यकारी अभियंता दीपेंद्र कोराटे ,मनपाचे अधिकारी व खासगी कंत्राटदार तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. विभागीय आयुक्तांनी जॅकवेल, पंपिंग व्यवस्था, पाणी शुद्धीकरण प्रक्रिया तसेच सुरू असलेल्या कामांची सद्यस्थिती यांचा सविस्तर आढावा घेतला. शहरात सध्या जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू आहे. या कामामुळे काही ठिकाणी रस्ते खराब होत असले तरी काम पूर्ण झाल्यानंतर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत महानगरपालिका व प्रशासन सकारात्मक निर्णय घेणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी या कामात सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पाणी चाचणीदरम्यान आढळून आलेल्या पाईपलाईन लिकेजच्या कारणांचा शोध घेऊन अशा त्रुटी पुन्हा होणार नाहीत यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, तसेच त्यावर दीर्घकालीन उपाययोजना कराव्यात, अशा सूचना त्यांनी दिल्या.

# कन्नड तहसील कार्यालयात 55 अंत्योदय शिधापत्रिकांचे वितरण; लाभार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण





**तभा वृत्तसेवा**

कन्नड - दि. 25 एप्रिल - राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांनी आज कन्नड तहसील कार्यालयाला भेट देत अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत तालुक्यातील गरजू नागरिकांना अंत्योदय शिधापत्रिकांचे वितरण केले. या कार्यक्रमात विशेषतः आदिवासी बांधव, अंध तसेच अनाथ मुलांना प्राधान्य देण्यात आले.

यावेळी एकूण 55 अंत्योदय शिधापत्रिकांचे वितरण करण्यात आले. शिधापत्रिका मिळाल्यामुळे लाभार्थ्यांना शासनाच्या अन्नसुरक्षा योजनांचा थेट लाभ मिळणार असून त्यांच्या दैनंदिन जीवनात मोठा दिलासा मिळणार आहे. कार्यक्रमादरम्यान लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद स्पष्टपणे दिसून आला.

या प्रसंगी जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी बागुल, तालुका पुरवठा अधिकारी निलेश राठोड नायब तहसिलदार दिलीपकुमार सोनवणे,ऑपरेट पवन खंडागळे,एजाज शेख, कोतवाल शांताराम गायकवाड, शिपाई जयलाल राठोड,गणेश सौदागर,उपस्थित होते. सर्व अधिकाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले.

महेश ढवळे यांनी या वेळी तालुका प्रशासन आणि पुरवठा विभागाने केलेल्या कार्याचे कौतुक केले. तसेच पात्र लाभार्थ्यांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचवण्यासाठी प्रशासनाने अधिक कार्यक्षमतेने काम करण्याचे आवाहनही केले.

लाभार्थ्यांनी शिधापत्रिका मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त करत प्रशासनाचे आभार मानले. शासनाच्या अन्नसुरक्षा योजनांमुळे वंचित घटकांना आधार मिळत असल्याचे यावेळी अधोरेखित झाले.सूत्रसंचालन सागर फुके यांनी केले तर आभार तालुका पुरवठा अधिकारी निलेश राठोड यांनी केले

**जाहीर प्रगटन**

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं.२६३/२०२६

अर्जदार :-१) चंद्रकलाबाई सकाहरी गायके,२) पदमा बाळासाहेब शिंदे, रा.आय.बी.२०, तिरुपती सुप्रिम एनक्लेव्ह, जालन नगर, रेल्वे स्टेशन, औरंगाबाद ३) रुक्मिणी शरद मिसाळ, रा. तिरमल वस्ती, भेंडे बु. ता. नेवासा जि.अहमदनगर ४) उषा नवनाथ रोडगे, रा. महालक्ष्मीखेडा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ५) सुनिता सखाहारी गायके,६) कारभारी सखाहरी गायके,

अर्जदार नं.१,५ व ६ रा. सुलतानाबाद, ता. गंगापूर जि.औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण:- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ अड.एस.पी.लबडे, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला की. अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन सखाहरी लक्ष्मण गायके यांचा दि.केला आहे की, आराजी मौजे सुलतानाबाद, ता. गंगापुर जि.औरंगाबाद येथे वृध्दापकाळामुळे मृत्यु झाला आहे. तसेच मयत सखाहरी लक्ष्मण गायके यांची आई नामे मालनबाई लक्ष्मण गायके आणि वडील नामे लक्ष्मण तसेच यांचा यापूर्वीच मृत्यु झालेला आहे. मयत सखाहरी लक्ष्मण गायके आणि अर्जदार नं. १ हे आपसात पती पत्नी होते व त्यांचे वैवाहिक संबंधातुन अर्जदार नं. २ ते ६ यांचा जन्म झाला आहे. मयत सखाहरी लक्ष्मण गायके यांची अर्जदार नं. १ विधवा पत्नी आणि अर्जदार नं. २ ते ६ मुली व मुले आहेत. मयत सखाहरी लक्ष्मण गायके यांना अर्जदार नं.१ ते ६ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयत सखाहरी लक्ष्मण गायके यांना इतर कोणीही वारसदार नाहीत. करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २२/०४/२०२६ रोजी दिले.

पुढील तारीख १५/०६/२०२६

कनिष्ठ लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर, गंगापुर